शुक्रवार, ३ फेब्रुवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१६२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • FRIDAY 3 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-162 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# शेतकऱ्यांनी चिंता न करता चिंतन करावे

## श्री श्री रविशंकर : गावांना पाणीदार करण्यासाठी जलतारा उपक्रम अतिशय महत्त्वाचा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : समस्या येतात आणि जातात मात्र या समस्यांमुळे कोणाचे संबंध आणि मन तुटू नये. आपल्या मधील विश्वास हा कायम ठेवला पाहिजे आणि त्यासाठीच गुरु हा महत्त्वाचा धागा आहे. आपल्याकडे गुरु येतात ते समस्या घेऊन जाण्यासाठी, त्यामुळे आता शेतकऱ्यांनी चिंता न करता चिंतन करावे. घरोघरी ध्यान साधना सुरू करावी. जेणेकरून रोग आणि व्यसनापासून मुक्ती मिळेल, असा सल्ला आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांनी दिला.**

आर्ट ऑफ लिव्हिंग अर्थात जगण्याचे कौशल्य शिकविणारे श्री श्री रविशंकर यांच्या प्रेरणेतून मंठा आणि परतूर तालुक्यात शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची उपलब्धता करणाऱ्या जलतारा या प्रकल्पांतर्गत घेतलेला उपक्रमाला यश आले आहे. त्यामुळे या परिसरातील शेतीमध्ये आज पाणी दिसायला लागले आहे. या उपक्रमाची पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी गुरुवारी स्वतः श्री श्री रविशंकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे परतुर तालुक्यातील वाटूरजवळ असलेल्या श्री श्री ज्ञानक्षेत्र आर्ट ऑफ लिव्हिंग येथे आले होते. यावेळी शेतकऱ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. पुढे बोलताना श्री श्री रविशंकर म्हणाले की, नैसर्गिक शेती ही काळाची गरज आहे त्यातूनच देशाचा विकास होईल. धर्माच्या आश्रयाने जनता सुखी राहते, मात्र त्याला राजाश्रेयाची देखील जोड पाहिजे. राजाश्रयाने सिद्धांतावर टिकले पाहिजे आणि या सिद्धांतावर टिकण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सरकार करेल आणि शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सध्या सुरू असलेल्या फास्ट फूड आणि जंक फूडमुळे देशातील 30 टक्के निधी हा परदेशात जात आहे. आता याकडे केंद्र सरकारने लक्ष दिल्यामुळे निश्चितच यालाही आळा बसेल, असे त्यांनी सांगितले. दरम्यान आपण आपल्या क्षेत्रात कुठेही कमी नाहीत. प्रकृती आपल्या सोबत आहे, फक्त तिला आपण ओळखले पाहिजे, असे मतही श्री श्री रविशंकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जलतारा प्रकल्पाचे संयोजक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी करून हा प्रकल्प कशा पद्धतीने राबविला जातो याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शनादरम्यान एकाच व्यासपीठावर अध्यात्म आणि राजाश्रय आल्यामुळे या दोघांनीही एक दुसऱ्यावर कौतुकांचा वर्षाव केला. सकारात्मक बाबींना एकत्र आणण्याचे आश्वासनही दिले. प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी या शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले होते.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, जलताराच्या माध्यमातून झालेल्या सकारात्मक बदलाचा राज्य शासन विचार करील आणि शासनाच्या वतीने हा प्रकल्प राबवल्या जाऊन तो पुढे वाढवला जाईल . पूर्वी युती शासनाने देखील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत अशाच प्रकारचे उपक्रम राबविले होते . मात्र दुर्दैवाने मागील अडीच वर्षाच्या कार्यकालात या योजना बंद केल्या . तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेली ही जलयुक्त शिवार योजना आदर्श होती . त्यामुळे शेतकऱ्यांची उन्नती आणि प्रगती होत होती . गुवाहाटीच्या आतापर्यंत झालेल्या तर्कवितर्कांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गुवाहाटीला असताना आपण श्री श्री रविशंकर यांना फोन केला होता आणि त्यांनी दिलेला आशीर्वाद कामाला आला . म्हणूनच आज आमचे सरकार सत्तेवर आहे . त्यामुळे त्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या योजनांचा स्वीकार करणे हे सरकारसाठी भूषणावह आहे .

# गूढ आवाजाने पैठण पुन्हा हादरले

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** दोन वर्षानंतर पुन्हा गुढ आवाजाने गुरुवारी एकदा पैठण शहर व परिसर हादरला आहे. गेल्या काही वर्षात गुढ आवाजाचे हादरे पैठणकर ऐकत आहेत; पण हा आवाज कशाचा व कुठुन येतो याची सखोल माहिती मिळतच नसल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण आहे.

या आवाजाची भूकंप मापन यंत्रावर नोंद होत नसल्याने नेमका हा आवाज येतो कोठून हा प्रश्न मात्र जनतेला भेडसावत आहे. गुरुवारी दुपारी दीड वाजेच्या दरम्यान शक्तिशाली गूढ आवाजाने पैठण शहर व शहराच्या १० किलोमीटर परिघात या गुढ आवाजाची तीव्रता जाणवली. आवाजाच्या तीव्रतेने नागरिकांमध्ये थोडावेळ चलबिचल झाली होती. पैठण शहरास व परिसरातील अनेक गावांना अशा आवाजाचे हादरे ठराविक कालावधीनंतर सातत्याने बसत आहेत. मात्र प्रशासनाकडून या आवाजाबाबत खुलासा होत नसल्याने जनतेत आवाजाबाबत तर्क वितर्क लढवले जात आहेत. आवाजाची तीव्रता जास्त असल्याने अनेक नागरिकांच्या घराच्या भिंती हादरल्या. छताचे पत्रे थरथरले, खिडकीच्या काचा कंप पावल्या, असे माजी नगरसेवक सोमनाथ परळकर यांनी सांगितले.

गेल्या कित्येक वर्षांपासून पैठणकरांसाठी गुढ आवाज म्हणजे एक रहस्यच आहे .मी स्वत : आतापर्यंत पंधरा वेळा आजच्या सारखा गुढ आवाज पुन्हा ऐकला आणि काही काळ का होत नाही भीतीचे वातावरण होते . परंतु या गुढ आवाजाचा शोध व रहस्य उलगडत नसल्याने शहरात तसेच ग्रामीण भागात काही काळ चर्चेचा विषय झाला . **पवन लोहिया, अध्यक्ष व्यापारी महासंघ पैठण**

# बालेकिल्ल्यातच भाजप पराभूत

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** विधानपरिषदेच्या नागपूर शिक्षक मतदारसंघ निवडणुकीची मतमोजणी पार पडली. नागपूरमध्ये भाजप समर्थित नागो गाणार आणि मविआ पुरस्कृत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे उमेदवार सुधाकर अडबाले यांच्यात लढत झाली. नागो गाणार यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. ते गेल्या दोन टर्म या मतदारसंघाचे आमदार होते. तिसऱ्या वेळी विजय मिळवून हॅट्रिक करण्याची त्यांची संधी हुकली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेकडून भाजपच्या समर्थनावर नागो गाणार यांनी निवडणूक लढवली होती. पण, अँटीइन्कबन्सीचा त्यांना फटका बसला. पहिल्या फेरी अखेर सुधाकर अडबाले यांना १४०६९ मते मिळाली तर नागो गाणार यांना ६३६६ मते मिळाली होती. अडबाले यांच्या विजयाची अधिकृत घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही.



सुधाकर अडबाले

सुधाकर अडबाले हे चंद्रपूरचे असून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाकडून त्यांनी उमदेवारी अर्ज दाखल केला होता. काँग्रेसने सुधाकर अडबाले यांना वर्षभरापूर्वीच कामाला लागण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, मविआच्या बैठकीत हा मतदारसंघ शिवसेनेला गेला होता. नाशिकमध्ये सुधीर तांबे यांनी काँग्रेसकडून अर्ज न दाखल केल्याने मतदारसंघांची अदलाबदली करण्यात आली. यामध्ये सेनेने नागपूरच्या जागेवरुन उमेदवार मागे घेतला. मविआने सुधाकर अडबाले यांना पाठिंबा जाहीर केला. काँग्रेस नेते अभिजीत वंजारी, राजेंद्र मुळक, बबनराव तायवाडे, विजय वडेट्टीवार, खासदार बाळू धानोरकर यांनी सुधाकर अडबाले यांच्या विजयासाठी मोर्चेबांधणी केली आणि विजय खेचून आणला. काँग्रेसने भाजपला पदवीधर पाठोपाठ नागपूर शिक्षक मतदारसंघात धक्का दिला आहे. नागूपर, कोकण आणि औरंगाबाद या तीन शिक्षक मतदारसंघांपैकी दोन मतदारसंघात विद्यमान आमदारांना फटका बसल्याचे चित्र आहे. कोकण मतदारसंघात शेकापच्या बाळाराम पाटील यांना पराभवाचा धक्का बसला. तर, नागपूरमध्येही नागो गाणार यांना अँटीइन्कबन्सीचा फटका बसला आहे. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ आणि काँग्रेसच्या नेत्यांनी दाखवलेली एकजूट आणि जुन्या पेन्शनचा मुद्दा सुधाकर अडबाले यांच्या विजयात महत्त्वाचा ठरला आहे. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना देवेंद्र फडणवीस यांनी जुनी पेन्शन देता येणार नाही, असे म्हटले होते. जुन्या पेन्शनवरुन शिक्षकांमध्ये याबद्दल रोष होता. त्याचाही फटका नागो गाणार यांना बसला आहे.

## चर्चेतली बातमी

# लातूर रेल्वे कारखान्यात वंदे भारतची निर्मिती

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** रेल्वे कारखान्यात वंदे भारत एक्स्प्रेसची निर्मिती केली जाणार असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. दोन वर्षांपूर्वी हा कारखाना सुरू झाला असला तरी कोणत्याही मोठ्या प्रकल्पातील रेल्वे गाड्यांची बांधणी अद्यापही होऊ शकलेली नाही. मात्र आता वंदे भारतची निर्मिती या कारखान्यात सुरू होणार आहे. लातूरसह चेन्नई, सोनीपत, रायबरेली येथे वंदे भारत एक्सप्रेसची निर्मिती जाणार आहे.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, अमृत भारत योजनेअंतर्गत देशातील 1272 रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, नवी दिल्ली, कानपूर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल, अहमदाबाद आणि लखनौसारख्या मोठ्या रेल्वे स्थानकासह पुरी, जोधपूर, गांधीनगर आणि जयपूरमधील लहान मोठ्या रेल्वेस्थानकांचा कायापलट करण्याच येणार आहे. आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत स्वदेशी हायड्रोजन ट्रेनची सुरुवात डिसेंबर 2023 मध्ये करण्यात येणार आहे. या ट्रेनची सुरुवात डिसेंबर 2023 मध्ये करण्यात येणार आहे. ही संपूर्ण स्वदेशी बनावटीची ट्रेन आहे.

# अमेरिकेचे एमक्यू-९बी प्रीडॅटर सशस्त्र ड्रोन लष्करात

## चीनचे आक्रमक धोरण लक्षात घेता भारताला नव्या सशस्त्र ड्रोनची आवश्यकता

आधुनिक केसरी न्यूज


**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षात अनेक देशांमध्ये लष्करापासून ते पोलीस विभागापर्यंत ड्रोनचा वापर केला आहेत. विशेषतः काही प्रमुख देशांचा भर हा लष्करी वापरासाठी तेही सशस्त्र ड्रोनच्या वापरावर राहिला आहे. अमेरिकेसारख्या देशामध्ये तर लढाऊ विमानांप्रमाणे ड्रोनची स्वतंत्र स्कॉड्रन आहेत. अमेरिका ही सध्या ड्रोनच्या लष्करी वापराबाबत जगात अग्रेसर असून दहशतवादी विरोधातल्या कारवाईबाबत विविध प्रकारचे ड्रोन हेच त्यांचे प्रमुख अस्त्र राहीले आहे. चीनही ड्रोनच्या वापराबाबत अमेरिकेशी बरोबरी करु पाहत आहे. गेल्या तीन वर्षातले चीनचे आक्रमक धोरण लक्षात घेता भारताला नव्या सशस्त्र ड्रोनची आवश्यकता जास्त भासू लागली आहे. एमक्यू-9 रिपीटर भारत अमेरिकेकडून गेली काही वर्षे ड्रोन घेण्याबाबत चर्चा करत आहे. सतेव्हा दोन एमक्यू-9 रिपीटर हे ड्रोन अमेरिकने प्रायोगिक वापर करायला भारतीय नौदलाकडे सूपूर्त केली आहेत. भाडे तत्तावर त्याचा सध्या वापर करत असून लवकरच हे ड्रोन अमेरिकेला परत केले जाणार आहे. मात्र गेल्या काही दिवसांतील चर्चेनंतर एमक्यू-9बी प्रीडॅटर हे सशस्त्र ड्रोन अमेरिकेकडून घेण्याबाबत आता शिक्कामोर्तब झालं आहे. अशी एकूण ३० ड्रोन भारत घेणार



आहे. लष्कर, नौदल आणि वायू दल यांना प्रत्येकी १० ड्रोन देण्याचे नियोजन आहे. या सर्व करार तीन अब्ज डॉलर्सच्या घरात असेल. सध्या भारताकडे इस्त्राईल बनावटीची IAI EITAN, IAI HERON, IAI SEARCHER तर स्वदेशी बनावटीचे DRDO LAKSHYA ड्रोन वापरले जात आहे. मात्र अमेरिकेकडून घेतले जाऊ शकणारे एमक्यू-9बी प्रीडॅटर हे वर उल्लेख केलेल्या सर्व ड्रोनपेक्षा वरचढ असणार आहे. जमीन आणि हवेतील लक्ष्यावर नजर ठेवत सलग १४ तास टेहेळणी करत उड्डाण करण्याची क्षमता हे या ड्रोनचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. तसंच एका दमात १८०० पेक्षा जास्त किलोमीटर अंतर पार करण्याची क्षमात यामध्ये आहे. हवेतून हवेत मारा करु शकणारी क्षेपणास्त्रे, हवेतून जमिनीवर मारा करणारी क्षेपणास्त्रे आणि बॉम्ब टाकण्यााची क्षमता या ड्रोनमध्ये आहे. तसंच जास्तीत जास्त ४८० किलोमीटर प्रति तास या वेगाने हवेत संचार करण्याचे कौशल्य या ड्रोनमध्ये असल्याने एमक्यू-9बी प्रीडॅटर हे सध्याच्या काळातील सर्वात घातक ड्रोन समजले जाते.

अशा ड्रोनमुळे चीनच्या सीमेवर तसंच विस्तृत समुद्री क्षेत्रावर नजर ठेवणे आणि वेळ प्रसंगी हल्ला करणे शक्य होणार आहे. तेव्हा अमेरिकेकडून एमक्यू-9बी प्रीडॅटर ड्रोन घेण्याबाबत चर्चा पूर्ण करणे करार करणे हे किती लवकरात लवकर होणे हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

व पु काळेंच्या पुस्तकात एक गोष्ट वाचली होती. एका शाळेत असेच आदर्श आणि ध्येयवादी शिक्षक असतात. ते मुलांना नागरिकशास्त्र शिकवतात. त्यात उत्तम नागरिक म्हणून वागताना आपण कसे वागावे, केवळ आपल्या घरचीच नव्हे तर आपल्या आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता ठेवणे हे एक नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे हे त्यांनी शिकवले. नंतर त्या मुलांची परीक्षा घेताना त्यांचे त्यांनी निरीक्षण केले. एका दिवशी दोन पेपर होते.

एक पेपर संपल्यानंतर मध्ये थोडा वेळ होता. काही वेळाने दुसरा पेपर होता. या मधल्या वेळात काही मुले शाळेच्या बाहेर जाऊन आली . त्या वेळेस त्यांनी काही खाद्यपदार्थ विकत घेतले. काही मुलांनी त्याचे कागद शाळेच्या मैदानातच इतरत्र टाकले. काही विद्यार्थ्यांनी मात्र कचरापेटी शोधून त्यात ते कागद टाकले. ते शिक्षक त्या मुलांचं काळजीपूर्वक निरीक्षण करीत होते. ज्या विद्यार्थ्यांनी ते कागद मैदानात टाकले, ते फक्त नागरिकशास्त्रातला धडा शिकले होते. पण ज्या मुलांनी ते कागद डस्टबिनमध्ये टाकले त्यांनी ते शिकलेलं अमलात आणलं होतं. अर्थात त्या शिक्षकांनी मैदानात कागद फेकणाऱ्या मुलांना त्यांची उत्तरे बरोबर असूनही नागरिकशास्त्रात गुण दिले नाहीत. अर्थात त्या शिक्षकाला पुढे पालक आणि मुख्याध्यापकांच्या रोषाला तोंड द्यावे लागले आणि त्याचे पर्यवसान त्यांनी राजीनामा देण्यात झाले हा भाग वेगळा. पण खरे शिक्षण आणि शिक्षक कसे असतात हे सगळे सांगण्यासाठीच आजच्या या लेखाचा प्रपंच..!



## आनंदी पहाट

# श्वास आणि विश्वास दोन्हीही महत्त्वाचेच

आधुनिक केसरी

आपल्याला आयुष्य जगण्यासाठी जसा श्वास गरजेचा असतो, तसाच आपल्या आयुष्यात जगण्यापलीकडचे जीवन जगण्यासाठी विश्वास महत्वाचा असतो. आपल्या जीवनांत आपल्याला लाभलेले जाज्वल्य हे फक्त श्वास- विश्वासावरच अवलंबून, टिकून रहात असते. श्वसन प्रकाराच्या उपयोगातून आपले जगणे अधिक सुलभ, सुरक्षित आणि सुंदर करणे आपल्यावरच अवलंबून असते. जितका मोठा श्वास घेतला जातो तितकेच आयुष्य मोठे, दीर्घ होत जाते. ह्या श्वासावर नियंत्रण करण्याचे शास्त्र आपण अवगत केले, कि समजायचे, आपण आपल्या जगण्यावर विजय मिळवला. खरे तर अगदी सहज आणि नकळत घेतलेल्या श्वासाचे किती महत्व असते, हे समजून घेण्याची जाणीव होणे जरुरीचे असते. नकळत केलेल्या अनेक गोष्टी आपल्याकडून अनेकदा दुर्लक्षित रहात असतात. श्वास आणि विश्वासाचे देखील तसेच असते. श्वास-विश्वासाच्या बाबतीत खरेच आपण नेहमीच गाफील रहात असतो, हीच खरी उणिव म्हणावी लागेल. अनेकदा आपल्या बाबतीत जसे श्वासाचे, तसेच विश्वासाचे सुद्धा असते. आपण अगदी सहजपणे केवळ दृश्य पण आभासी जगावर आंधळेपणाने विश्वास टाकत असतो. आपल्या डोळ्यांवर चढलेली विश्वासाची झापडे आपल्याला भ्रमांत अडकवतात. आपल्याला अगदी नुकत्याच भेटलेल्या व्यक्तीबरोबर, एखाद्या योजनेसाठी, जाहिरातींना भुलून जाऊन आपले सर्वस्व सुद्धा अर्पण करायला तयार होतो. अगदी काही क्षणांत, काही काळांत आपण त्यांवर विश्वास ठेवतो आणि व्यवहार करून मोकळे होते. पण हे मोकळे होणे आपला खिसा, तिजोरी देखील मोकळे करत आहे ह्याची जाणीवही होत नाही. आपण म्हणतो, कि आपण माणसे ओळखायला चुकत नाहीत म्हणून; परंतू त्याच माणसांचे मन ओळखू शकत नाहीत, हीच शोकांतिका ठरते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## मिळे ज्याचे त्यासी | कर्म फळ ||

कुणाचे फुकाचे | घालू नये मुखी ||
तोच खरा सुखी | कष्टकरी ||१||
दुसऱ्याचे धन | लखलाभ त्याला ||
मोह या जीवाला | नको देवा ||२||
आयते घबाड | नाशाला कारण ||
दानवाचे श्वान | तरी बरे ||३||
गरीबीचा भार | सोसेन आनंदे ||
भोगेन स्वानंदे | भोग सारे ||४||
हरिनामा पुढे | थिट्या धन राशी ||
मीळे ज्याचे त्यासी | कर्मफळ ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**कृतज्ञतापूर्वक वागल्याने पुण्य मिळेल वा मिळणार देखील नाही; पण कृतज्ञतापूर्वक वागला नाहीत तर मात्र तुम्हांस नियतीकडून शिक्षा होईल हे नक्की समजा.**

**स्वतःवर प्रेम करणे यात गैर काहीच नाही. स्वतःहून प्रेम करणे यातही काही गैर नाही. केवळ तुम्ही प्रेम करता इतक्याच कारणाने तुम्हाला समोरच्या व्यक्तिकडून प्रेम मिळेल याची खात्री देता येणार नाही. निरपेक्ष प्रेमाचा आनंद चिरंजीवी ठरतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**माया सुक्षम मनहिं है, मन कर सकल पसार ।**
**कवि कोविद ऋृषि मुनि पड़े, सद्गुरु एक अधार ।।२३।। (स्वर्वेद पंचम मण्डल द्वितीय अध्याय) ०५/०२/२३**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

सूक्ष्म माया मनच आहे. मनाचाच सर्व विस्तार आहे. ऋषी-मुनी तसेच समस्त प्राकृतिक विद्वान या मनाच्या जाळ्यात अडकलेले आहेत. याच्यापासून सुटण्यासाठी सद्गुरू हेच एकमात्र आधार आहेत.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

आपण फसलो की काय आतापर्यंत आपण केलेले सर्व वाया गेले की काय ?ब्रम्ह वस्तु आहे की नाही अशा अनेक संशयाच्या फे-यात मन सापडते.मन अस्वस्थ होते. ब्रम्ह चिंतन किंवा ब्रम्ह ध्यान करायला जावे तर द्वैत निर्माण होते. ते होऊ नये म्हणून ब्रम्ह ध्यान किंवा चिंतन करणे सोडून दिले तर समाधान मिळत नाही. मनाला जशी सवय लावावी तशी लागते. ब्रम्ह चिंतनाची सवय जर मनाला लावली तर काही दिवसांनी ब्रम्ह साक्षात्कार होईल ।त्याच्या जोडीला नित्यनेमाने सगुण निर्मळ विचार मनात ठेवले तर समाधान मिळेल. द्रुष्य चिंतन सोडून ब्रम्ह चिंतन मनाकडून करवून घ्यावे हा खरा राजमार्ग या ठिकाणी आपल्याला सापडतो.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# कर्तव्य करावे, मग व्हायचे ते होऊ द्यावे

आधुनिक केसरी

जगामध्ये आणि जीवनामध्ये दुःख आहे यात शंका नाही. पण त्यापैकी पंचवीस टक्के दुःखच बाहेरून येते. युद्ध, महागाई, दुष्काळ, चोऱ्यामाऱ्या, दारिद्र्य इत्यादिंचे दुःख बाहेरून येते. पण पंचाहत्तर टक्के आपले दुःख आपल्यामधूनच निर्माण होत असते. आपले शरीर, मन आणि हृदयस्थ भगवंत मिळून आपण बनतो. भगवंत आनंदरूप असल्याने तो दुःख निर्माण करू शकणार नाही. देहाचा स्वभाव झिजणे, क्षीण होणे, असमर्थ होत जाणे, हा असल्याने तो आपल्या मार्गाने जात असतो. तो दुःख निर्माण करू शकत नाही. जे जडच आहे ते सुखही देऊ शकत नाही आणि दुःखही निर्माण करू शकत नाही. उरले आपले मन. कुठेतरी चिकटणे हा मनाचा स्वभावधर्म असल्याने ज्याला ते चिकटते त्याचे गुणधर्म अंगिकारते. भक्ताचे मन भगवंताला चिकटते म्हणून त्याच्या मनातून दुःख निर्माण होऊच शकत नाही. ज्याचे मन देहाला चिकटते, त्याचे मन दुःख निर्माण करीत असले पाहिजे. भगवंताहून वेगळेपण आणि देहाशी एकपण, या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. देह लहान आहे, आकुंचित आहे, तात्पुरता आहे, सान्त आहे, तोच मी आहे अशा घट्ट भावनेने जिकडेतिकडे दोनपण दिसू लागते आणि त्यातून भयरूपी समंध साकार होतो आणि तो जीवाला छळतो. भगवंताच्या स्मरणात आनंदाची मस्ती भोगायला जन्मलेला माणूस,



भयापोटी चिंता आणि चिंतेपायी दुःख निर्माण करतो. भगवंताने आपल्या संकल्पाने जग निर्मिले. त्यात घडणाऱ्या घटनांचा आराखडा त्या संकल्पात असतो. कालचक्र जसे फिरते तशा घटना आकार घेत जातात. त्यात भगवंताचा हात असतो. त्याचा विसर पडला की आपण गोंधळून जातो, आणि आपली कल्पना भय निर्माण करते. भगवंत मला सांभाळणारा आहे ही वस्तुस्थिती आहे, कारण भगवंताने स्वतःतूनच हे जग निर्माण केले. आपण अंतर्यामी त्याच्या नामात गुंतून राहिलो, तर त्याचे साहाय्य कसे मिळते याचा अनुभव आपोआप येईल. भगवंत नामस्वरूप आहे, म्हणून त्याच्या नामात राहाणाऱ्याला देहाचे काय होईल याचे भय उरत नाही.

आपल्या प्रयत्नाने जेवढ्या गोष्टी करता येतील तेवढ्या करा. त्या होतच असतात, प्रयत्नाने फक्त आपला हात लागतो. आपल्या मनासारखे व्हावे असे म्हणणे म्हणजे ज्या होणाऱ्या गोष्टी आहेत त्या मी बदलाव्या, असे म्हणण्यासारखे आहे. त्या कधी बदलल्या जात नाहीत, आणि आपल्याला आनंद कधी मिळत नाही. म्हणून म्हणतो, रामावर निष्ठा ठेवावी. माझे कर्तव्य मी केले आहे ना ? ते करीत असताना मी अनीति, अधर्माने वागलो नाही ना ? आता जे व्हायचे ते होऊ दे; कुठे काळजी करा ! ही वृत्ती ठेवून जगात जो वागेल ना, तोच मनुष्य सुखी होईल. **आजचे बोधवचन आहे - देहाचा लगाम भगवंताच्या हातात द्यावा आणि नामस्मरणात मजेत दिवस घालवावे.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥२॥
तुका म्हणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ॥३॥
सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥
जोंवरी या तुम्हां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥२॥
तुका म्हणे काय वांयांविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥३॥
आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण । कौतुकें खेळणें संग होता ॥१॥
आतां अनावर जालें अगुणाची । करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥
तुका म्हणे आतां बुडविलीं दोन्ही । कुळें एक मनीं नारायण ॥३॥
सासुरियां वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावें चि ॥१॥
सांडवर कोणी न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥२॥
न व्हावी ते जाली आमुची भंडाई । तुका म्हणे काई लाजों आतां ॥३॥
मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥१॥
आतां तुम्ही पाहा आमुचें नवल । नका वेचूं बोल वांयांविण ॥२॥


विद्रोही संत : संत तुकाराम महाराज पान ४

# आधुनिक केसरी


एसटीचे सारथ्य करताना ती लवकरच दिसणार पान ७

शुक्रवार, ३ फेब्रुवारी २०२३



# भाविकांसाठी चार ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** माघ शुध्द एकादशी बुधवार दि. 01 फेब्रुवारी 2023 असून या यात्रेचा कालावधी 26 जानेवारी ते 05 फेब्रुवारी असा आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात मोठ्या प्रमाणात भाविक येतात. यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या आरोग्य, स्वछता व सुरक्षेला प्रशासनाने प्राधान्य दिले असून, भाविकांच्या मदतीसाठी चार ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती प्रातांधिकारी गजानन गुरव यांनी दिली.

माघी वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय येऊ नये यासाठी पत्राशेड, 65 एकर, चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर या चार ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली आहे.तसेच चंद्रभागा नदीपात्रात स्नानासाठी भाविक मोठ्या प्रमाणात जातात त्यांच्या सुरक्षेसाठी आपत्ती व्यवस्थानतर्गत दोन यांत्रिक बोटी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह तैनात ठेवण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

माघ यात्रा सुरक्षित व निर्विघ्नरित्या पार पाडण्यासाठी यात्रा कालावधीत भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या असून, भाविकांना सरंक्षण देण्यासाठी, चोरी रोखण्यासाठी वारकरी वेषात पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात केले आहेत. तर 125 सीसीटिव्ही कॅमेरॅच्या माध्यमातूनही लक्ष ठेवले जात आहे, असे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी सांगितले.





# मुरमाची अवैध वाहतूक करणारे हायवा जप्त

## नायब तहसीलदार मोनाली सोनवणे यांची मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील नादरपूर येथे अवैध मुरुम वाहतूक करणारे दोन हायवा जप्त करण्यात आले. महसुल विभागाची मोठी कारवाई करण्यात आली.

यावेळी जिल्हा अधिकारी आस्तीक कुमार पांडे, उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शना खाली नायब तहसीलदार मोनाली सोनवणे यांनी कारवाई केली. नादरपूर येथे सारोळा ते पिशोर रस्त्याचे काम सुरू आहे. गुत्तेदाराने विना परवाना अवैध उत्तखनन करून वाहतुक करणारे दोन हायवा वर कारवाई करण्यात आली कारवाई पथकामध्ये तुकाराम बनकर मंडळ अधिकारी, ज्ञानेश्वर शिंदे तलाठी, नारायण पठ्ठे तलाठी, सुभाष इमले कोतवाल यांची उपस्थीती होती.

# कापसातून जास्तीत जास्त नफा मिळवून देण्याचा निर्णय स्वागतार्ह : समीर मुळे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** देशातील कृषी क्षेत्राची कामगिरी यावर्षी कमालीची चांगली राहिली आहे. धान्य उत्पादन सातत्याने



वाढत असून त्यामुळे भरड धान्याच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन तसेच छोट्या सहकारी संस्था निर्मितीसाठी सहाय्य, दुर्बल घटकांतील शेतकऱ्यांना सक्षम करण्याचा, कृषीपूरक स्टार्टअपसाठी उपाययोजना तसेच फंड सहाय्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. कापसातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नफा मिळवून देण्यासाठी तसेच उत्पादन वाढीसाठीच्या उपाययोजना, डाळीसाठी विशेष हब तयार करण्याचा तसेच शेतकऱ्यांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म निर्माण



करण्याचा निर्णय चांगला आहे. रासायनिक खतांमध्ये केमिकलचा वापर खूप होत आहे, त्याचा वापर कमी करून पर्यावरणपूरक खतांना प्रोत्साहन तसेच रासायनिक खताचा वापर कमी करण्याचा निर्णय हा चांगला आहे. बियाणे, कृषी विषयक आणि इतर उद्योगासाठी प्रोत्साहन व योग्य त्या वातावरणाची गरज असून सातत्याने निसर्गाच्या लहरींमुळे तसेच पूर्णपणे हवामानावर अवलंबून असणाऱ्या बियाणे उद्योगाला या अर्थसंकल्पाकडून खूप काही अपेक्षा होत्या पण यावर्षी पण काही सवलती किंवा सहाय्य जाहीर झाले नाही पण आम्ही सकारात्मक आहोत. येणाऱ्या पुरवणी अर्थसंकल्पात आमच्या बियाणे उद्योगांसाठी निश्चितचं काही फलदायी निर्णय, सहाय्य किंवा प्रोत्साहन मिळेल. अशी आशा बाळगतो.

# सोलापूर ते मुंबई आणि मुंबई ते शिर्डी मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस लवकरच सुरू

## 10 फेब्रुवारी दोन्ही गाड्यांना पंतप्रधान दाखवणार हिरवा झेंडा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा मुंबईच्या दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी विविध विकासकामाचे उद्घाटन करणार आहेत. त्याशिवाय वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा कंदीलही दाखवणार आहेत. सोलापूर ते मुंबई आणि मुंबई ते साईनगर शिर्डी अशा दोन वंदे भारत एक्सप्रेस 10 फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. 10 फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या ठिकाणी या दोन्ही गाड्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी हिरवा झेंडा दाखवणार असल्याची प्राथमिक माहिती आहे. 10 फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीन वाजता हा सोहळा सुरू होणार आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे हे देखील या सोहळ्यासा उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. महाराष्ट्रात सुरु होणाऱ्या या वंदे भारत एक्स्प्रेस ही 9 वी आणि 10 वी गाडी असणार आहे. वंदे भारत एक्सप्रेसच्या या उद्घाटन समारंभाला राज्यातील काही निवडक विद्यार्थ्यांना रेल्वेतर्फे निमंत्रण देखील देण्यात येणार आहे. रेल्वेच्या संदर्भातील विषयांवर केंद्रीय विद्यालय तसेच राज्यातील शाळांमध्ये स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या स्पर्धेत विजयी होणाऱ्या विद्यार्थ्यांना वंदे भारत एक्सप्रेस चा प्रवास करता येणार आहे. मुंबई ते सोलापूर आणि मुंबई ते साईनगर शिर्डी जाणाऱ्या या गाड्यांचा ज्या ज्या स्थानकावर थांबा असेल तिथे स्वागताची तयारी देखील सुरु आहे. वंदे भारत एक्सप्रेस नियमित सुरु झाल्यानंतर



सोलापूर ते मुंबई हे अंतर रेल्वेने 455 किमी इतके आहे . वंदे भारत एक्सप्रेस साडे सहा तासात हा प्रवास पूर्ण करण्याची शक्यता आहे . सोलापूर, कुर्डूवाडी, पुणे, लोणावळा, ठाणे, दादर, हे थांबे या गाडीला असणार असल्याची प्राथमिक माहिती आहे . तर चेअर कार साठी 900-1100 रुपये आणि एक्सिक्युटिव्ह क्लाससाठी 1900-2200 रुपये इतके शुल्क असण्याची शक्यता आहे . या शुल्कात प्रवाशांना आरामदायी प्रवाशासह नाश्ता, पाणी बॉटल देखील मिळण्याची शक्यता आहे .

सोलापुरातून ही रेल्वे सकाळी सहा वाजता निघणार आहे. मुंबईत पोहोचायला जवळपास साडेसहा तास या गाडीला लागणार असून दुपारी 12.30 च्या सुमारास तिथे पोहोचेल. तसेच मुंबईतून दुपारी 4.30 च्या सुमारास ही गाडी सोलापूरच्या दिशेने रवाना होईल. सोलापुरात रात्री 10.40 वाजता ही गाडी पोहोचेल, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र वेळे संदर्भात अद्याप कोणाताही अधिकृत माहिती रेल्वेकडून जारी करण्यात आलेली नाही.




# राष्ट्रपतींच्या 'घरखर्चा'ला कात्री

आधुनिक केसरी

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी बुधवारी संसदेत २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये सर्वाधिक चर्चा झाली ती करप्रणालीमध्ये केंद्र सरकारने केलेल्या नव्या बदलांची! टॅक्सचे स्लॅब बदलण्यापासून करपात्र रकमेची मर्यादा वाढवण्यापर्यंत करदात्यांसाठी काही महत्त्वाच्या घोषणा यावेळी अर्थमंत्र्यांनी केल्या. करांसंदर्भातल्या घोषणांसोबतच इतरही अनेक घोषणा अर्थमंत्र्यांनी केल्या. त्यातील एक महत्त्वाची घोषणा सध्या चर्चेचा विषय ठरते आहे. ही घोषणा थेट भारताच्या राष्ट्रपतींबाबत असून त्यांच्या 'घरखर्चा'ला अर्थसंकल्पात कात्री लावण्यात आली आहे. राष्ट्रपतींचे घर अर्थात राष्ट्रपती भवनाच्या देखभाल आणि दैनंदिन खर्च अशा गोष्टींचा अंतर्भाव या खर्चामध्ये होतो. हा खर्च दरवर्षी देशाच्या अर्थसंकल्पामध्येच समाविष्ट केला जातो. शिवाय, राष्ट्रपती भवनात काम करणारे कर्मचारी, अधिकारी, राष्ट्रपतींचे गार्ड , राष्ट्रपतींचे सचिवालय या सगळ्यांच्या पगारांचा खर्चही याच खर्चामध्ये समाविष्ट असतो. गेल्यावर्षीपेक्षा यावर्षी तरतूद करण्यात आलेल्या निधीमध्ये तब्बल १० कोटींची कपात अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामुळे हा मुद्दा चर्चेचा विषय ठरला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पानुसार, राष्ट्रपतींचे कार्यालय आणि इतर सर्व गोष्टींसाठी मिळून २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी एकूण ९० कोटी १४ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षी हा निधी ८४.८ कोटी इतका होता. त्यामुळे एकूण निधीमध्ये साधारण ५.३४ कोटींची वाढ करण्यात आली आहे. यापैकी ६० लाख रुपये हे राष्ट्रपतींचा पगार आणि इतर भत्त्यांसाठी देण्यात आले आहेत. त्याशिवाय, ५३.३२ कोटींचा निधी राष्ट्रपतींच्या सचिवालयासाठी तर ३६.२२ कोटींचा निधी राष्ट्रपती भवनाच्या देखभाल, दुरुस्ती आणि नियमित खर्चासाठी देण्यात आला आहे. यामध्येच राष्ट्रपती भवनावरील कर्मचाऱ्यांच्या पगाराचाही अंतर्भाव आहे. दरम्यान, एकीकडे राष्ट्रपतींचे कार्यालय आणि इतर सर्व गोष्टींसाठी मिळून असलेल्या एकूण निधीमध्ये ५.३४ कोटींची वाढ करण्यात आली असली, तरी राष्ट्रपती भवन आणि त्यातील कर्मचाऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेला निधी हा गेल्या वर्षीपेक्षा १० कोटींनी कमी आहे. गेल्या वर्षी या खर्चासाठी ४६.२७ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली होती. या वर्षी हा निधी ३६.२२ कोटी इतका देण्यात आला आहे. त्याचवेळी राष्ट्रपतींच्या सचिवालयासाठी मंजूर निधीमध्ये १५.३९ कोटींची वाढ करण्यात आली असून गेल्या वर्षी ३७.९३ कोटी असणारा निधी यावर्षी ५३.२३ कोटींपर्यंत वाढवण्यात आला आहे.

# विद्रोही संत : संत तुकाराम महाराज

आधुनिक केसरी



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

**महाराष्ट्र हा संताची भुमी असलेले राज्य आहे. या भुमित संतानी आपले संपूर्ण आयुष्य समाजाच्या सामाजिक जागृती साठी खर्च केले आहे. प्रत्येक संताचा जागृतीचा विषय साधारणपणे विषमता, अंधविश्वास, धर्माच्या नावावर होणारी समाजाची लुट हेच होते. त्यापैकी एक संतश्रेष्ठ म्हणजे संत तुकाराम महाराज. संत तुकाराम महाराज यांनी आपल्या लेखनीमधुन व्यवस्थेवर वार करून समाजामध्ये प्रबोधन केले. आपले आयुष्य हे समाजातील जातीभेद, विषमता, अंधश्रद्धा, पाखंड दुर होण्यासाठी खर्च केले. प्रस्थापित व्यवस्थेच्या प्रवाहाच्या विरोधात जाऊन प्रबोधन करणे म्हणजे विद्रोहच होता.**

संत तुकाराम महाराज किती विद्रोही होते हे दोनच उदाहरणावरून लक्षात येते. पहिले उदाहरण म्हणजे संत तुकाराम महाराज यांच्या गाथा इंद्रायणी नदीत बुडवून संत तुकाराम महाराजांचे अभंग नष्ट करण्याचे येथील व्यवस्थेच्या धर्मांध लोकांनी केले. दूसरे उदाहरण म्हणजे ज्यांचे पोट अंधविश्वास व पाखंडावर होते त्यांनी तुकाराम महाराज यांची हत्या केली आणि काल्पनीक वैकुंठ गमनात बहुजन समाजाला गुंतवून ठेवले. ज्या तुकाराम महाराज यांनी आयुष्यभर अंधविश्वास व पाखंड यावर प्रहार केले त्याच तुकाराम महाराजांना हे काल्पनिक वैकुंठात विमानाने पाठवतात. यावरून हेच सिद्ध होते तुकाराम महाराज व त्यांचे अंभग विषमता, अंधश्रद्धा, पाखंडी व्यवस्थेला झुगारून समानता, विज्ञानवाद व कर्मवादाला महत्व देणारे होते. यामुळे धर्माला ज्या लोकांनी धंदा बनवला अशा लोकांसाठी संत तुकाराम महाराज हे घातकच होते म्हणून त्यांच्या गाथा व त्यांना ही संपविण्याचा प्रयत्न येथील धर्मांध लोकांनी केला. संत तुकाराम महाराज यांनी सामाजिक प्रबोधन केले आणि छत्रपती शिवरायांचे आदर्श समतावादी स्वराज्य उभे राहले एवढी ताकत संत तुकाराम महाराज यांच्या लेखनीमध्ये व अभंगामध्ये आहे.

**जाती विजातीची व्हायास भेटी |**
**संकल्प तो वाहो नये**

संत तुकाराम महाराज यांना असे वाटते की ज्या काही जाती आहेत त्यांनी एकत्र येऊन नांदावे. प्रत्येक जातीने दुसऱ्या जातीला भेटावे म्हणजे आपोआप भेदभाव कमी होऊन एक आदर्श समाज निर्माण होऊ शकतो. परंतु काही लोकांनी जाणीव पुर्वक जाती निर्माण केल्या, जाती निर्माण करून त्या जिवंत ठेऊन एका जातीला दुसऱ्या जातीपासुन वेगळे केले आणि या जाती एकत्र कधीच येणार नाही याची व्यवस्था केली. अशा लोकांना हा संदेश तर धर्म द्रोहीच वाटणार परंतु तुकाराम महाराज यांच्या गाथा बघितल्या तर अनेक ठिकाणी विषमता दुर होऊन समता प्रस्थापित होण्यासाठी त्यांनी प्रबोधन केले आहे. धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा पसरवून समाजाची तर्कीक व आर्थिक लुट करण्याणे धंदे सुरू झाले आहेत. अनेक भोंदु लोक स्वतः ला देवाचा दूत समजून अज्ञानी लोकांना भूलथापांना भुलवून, काल्पनिक शक्तीची, पाप पुण्याच्या गोष्टी सांगुन त्यांना धार्मिक बनवून लुटण्याचे काम करतात. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात..

**दंभे करी सोंग मानावया जग।**
**मुखे बोले त्याग मनी नाही।**

दांभिक लोक धर्माच्या नावाखाली वेगवेगळे सोंग करून लोकांना धर्माचे महत्त्व सांगुन लोभ माया करू नये. लोभ माया याचा त्याग करायला पाहिजे असे बोलतात परंतु मुळात असे सांगणारे लोक धनप्राप्ती करून जनतेला भुलवतात. असे भुलवणारे अनेक भोंदू निर्माण झालेले आहेत. आणि या भोंदुचे चलेचपाटे भक्तही असतात. जे की कोणत्याही गोष्टीचा सारासार विचार न करता भोंदु लोकांवर विश्वास ठेवतात. यामुळे समाजामध्ये अंधश्रद्धा वाढून सामाजिक हानी होते व अंधश्रद्धेवर पोट भरणाऱ्या लोकांचा फायदा होतो. भोंदु लोक धर्माचा प्रसार मुळीच करत नाही. हे जर बघायचे तर दान देणे बंद केले तर धंदा बंद होतो म्हणून तुकाराम महाराज अशा लोकांचा कठोर शब्दांत समाचार घेतात..

**तेवी अभक्तास आवडे पाखांड।**
**न लगे गोड त्या परमार्थ।**

एखाद्या गोष्टीची उपासना करणे ही गोष्ट वेगळी असते आणि पाखंड ही गोष्ट वेगळी असते. म्हणुन तुकाराम महाराज



पांखड, पाखंडी व त्यावर विश्वास ठेवण्याला भक्ती म्हणतात अशा लोकांना शाब्दिक चपराक देतात. पाखंडा बाजुला करून परमार्थ केला जातो परंतु पाखंड मधुन परमार्थ साध्य होत नाही. परमार्थ किंवा सेवा करताना कोणत्याही प्रकारचा मोबदला कुणाला देण्याची गरज नाही. धर्म वेगळा आणि धंदा वेगळा परंतु धर्मा मध्ये धंदा शोधने हे चुकिचेच आहे. आणि धर्माच्या आडून ज्यांना धंदा करायचा आहे त्यांना तर तुकाराम महाराज हे धर्म विरोधी वाटतात. कारण संत तुकाराम महाराज स्पष्ट अशा थोतांडाला विरोध करतात.

**पुजेलागी द्रव्य मागे।काय सांगे शिष्याते।**
**तुका म्हणे कैचे ब्रम्ह।अवघा भ्रम विषयाचा।**

पुजा अर्चा करण्यासाठी द्रव्याची गरजच नाही. परंतु वेगवेगळ्या पुजा व वेगवेगळ्या पुजेचे वेगवेगळे खर्च सांगुन समाजाची लुट होती. आणि अशा प्रकारच्या लुट थांबवण्यासाठी संत तुकाराम महाराज यांनी व्यवस्थेवर घाव घातले. पुजा आणि पैसा याचा काहीही संबध नाही म्हणून हा सर्व भ्रम वाटतो. आणि धर्माच्या नावाखाली धंदा करणाऱ्या लोकांची संख्या जास्त असल्याने समाजात अंधविश्वास जास्त पसरला गेला. त्यामुळे लोक अज्ञानी व मानसिक गुलाम होऊन एक काल्पनिक भिती निर्माण होते. आणि ही भीती माणसाला सत्य असत्या मधला फरक करू देत नाहीत. समाजामध्ये अशा प्रकारची लुट करणाऱ्या आणि धर्माच्या नावाखाली घरोघरी जाऊन अर्थाजन करणाऱ्या भोंदुविषयी संत तुकाराम म्हणतात...

**अंगी कवडे घाली गळा।परडी कळहीन हाती।**
**गळा गांठा हिंडे दारी।मनुष्य परी कुतरी ती।**
**माथा सेंदुर दात खाती।जेंगट हाती सटवीचे।**

संत तुकाराम महाराज यांची भाषा स्पष्ट आणि प्रखर असल्याने व वास्तविक विज्ञानवादी विचारांचा वारसा देशाला दिल्यानेच तुकाराम महाराज यांच्या गाथा बुडविल्या गेल्या. संत तुकाराम महाराज यांच्या मुळ गाथेवर जर प्रबोधन झाले तर देशातील भोंदु लोकांचे प्रमाण कमी होईल. लोकांची आर्थिक व माणसिक लुट कमी होईल. आणि भारतीय समाज विज्ञानवादाकडे वाटचाल करेल. परंतु तुकाराम महाराज यांच्या गाथा आजही लोकांना बोचणाऱ्या आहेत. लोकांच्या श्रद्धेचा व अज्ञानाचा फायदा घेऊन करोडो रुपयाची माया जमा करण्याऱ्या भोंदुची संख्या आजही वाढत आहे. आणि धर्मांध लोक भोंदु लोकांना समर्थन देऊन आपले बौद्धिक अपंगत्व दाखवून देत आहेत. देशातील भोंदूगिरी, अंधविश्वास, पाखंड व विषमता दुर करायची असेल तर संत तुकाराम महाराज यांच्या मुळ गाथा लोकांच्या मनावर बिंबवने आवश्यक आहे. संत गाथेचे अभ्यासक, प्रबोधनकार, सोशलमिडीया यांनी जर जबाबदारी घेऊन प्रामाणिक काम केले तर संत तुकाराम महाराज घराघरात पोहचवण्याचे काम अगदी सहज सोपे करून भोंदूगिरी ला अंधविश्वासाला आळा घालु शकतो. संत तुकाराम महाराज जयंती दिनी संत तुकाराम महाराज यांच्या विचाराचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प करूया. खऱ्या अर्थाने हेच तुकाराम महाराज यांना वंदन असेल.

# काश्मीरमध्ये निवडणूक ?

आधुनिक केसरी

**जम्मू काश्मीरचे विभाजन केले तेंव्हाच सरकार या भागात निवडणुका घेणार हे निश्चित झाले होते. केंद्र सरकारने निवडणूक आयोगाला तशा सूचनाही दिल्या होत्या. निवडणुका आयोगाने केंद्रशासित प्रदेश असलेल्या जम्मू काश्मीरच्या लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघ फेररचनेच्या शिफारशी ( परिसीमन ) केल्या आहेत. या शिफारशीनुसार ९० सदस्यांच्या विधानसभेत काश्मीरच्या ४७ जम्मूच्या ४३ जागा असतील तर लोकसभेच्या ५ जागा असतील. विसर्जित विधानसभेत एकूण ८७ सदस्य होते. त्यात जम्मूचे ३७ काश्मीरचे ४६ तर लडाखचे ४ सदस्य होते. नवीन रचनेत जम्मू विभागात विधानसभेच्या ६ जागा वाढतील तर काश्मीर विभागात १ च जागा वाढेल. जम्मू हा हिंदू बहुल भाग आहे.**

तेथील सदस्य संख्या वाढली तर त्याचा फायदा भाजपला होईल म्हणून जम्मू काश्मीरमधील राजकीय पक्षांनी त्यावर आक्षेप घेतला होता मात्र निवडणूक आयोगाने आता सर्व पक्षांच्या शंकांचे निरसन केल्याने निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. साधारणपणे मे महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात जम्मू काश्मीरमध्ये विधानसभेच्या निवडणुका होतील असा कयास बांधला जात आहे. राजकीय पक्षांनी देखील निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस बी. एल संतोष यांनी नुकतीच कार्यकर्त्यांची बैठक घेतली असून या बैठकीत त्यांनी कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या तयारीस लागण्यास सांगितले आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेची सांगताही काश्मीरमध्येच झाली त्यामुळे जम्मू काश्मीरमधील काँग्रेस कार्यकर्त्यांत चैतन्य निर्माण झाले असून राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेचा लाभ काँग्रेसला निवडणुकीत होईल अशी आशा काँग्रेसचे कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. फारुख अब्दुल्ला यांच्या नॅशनल कॉन्फरन्स आणि मेहबुबा मुफ्ती यांच्या पीडीपी पक्षाने देखील निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. अल्ताफ बुखारी नावाच्या एका स्थानिक काश्मीरी नेत्याने अपनी पार्टी नावाने नवीन पक्ष स्थापन केला असून या पक्षाची आणि भाजपची जवळील वाढली आहे. आगामी निवडणुकीत भाजप आणि अपनी पार्टी यांच्यात युती होईल असे वक्तव्य




अल्ताफ बुखारी यांनी व्यक्त केले आहे तसे झाले तर त्याचा भाजपलाच जास्त लाभ होईल. काही करून यावेळी जम्मू काश्मीरमध्ये भाजपचे सरकार आणायचेक असा चंग पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी बांधला आहे त्यासाठी भाजप कडून व्यापक प्रमाणात जनजागण मोहीम राबविण्यात येणार असून मोदी सरकारच्या योजना आणि केंद्र पुरस्कृत योजनेतून झालेल्या बदलांची माहिती जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी कार्यकर्त्यांची फळी उभारली जाणार आहे. पीडीपी च्या नेत्या आणि माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती या देखील छोट्या मोठ्या सभा घेऊन भाजपवर टीका करत आहेत. नॅशनल कॉन्फरन्स च्या उमर अब्दुल्ला यांनी देखील आमचा पक्ष निवडणूकीवर बहिष्कार घालणार नसून निवडणुक लढवणार असल्याची घोषणा केली आहे. त्यांनी देखील कार्यकर्त्यांना निवडणुकीस तयार राहण्याचे आवाहन केले आहे. काँग्रेसमधून फुटून स्वतःचा पक्ष स्थापन केलेले गुलाम नबी आझाद हे सध्या शांत असले तरी निवडणूक जवळ येताच ते ही सक्रिय होतील. भाजपची त्यांची जवळीक पाहता ते ही भाजपशी युती करू शकतात तसे झाले तर जम्मू काश्मीरमध्ये प्रथमच भाजपची सत्ता येऊ शकते. कदाचित जम्मू काश्मीरला पहिल्यांदाच हिंदू मुख्यमंत्री मिळू शकतो. निवडणुकीला अद्याप तीन ते चार महिन्यांचा कालावधी असला तरी सर्व पक्ष निवडणूक मोडमध्ये पोहचले आहेत. सर्वच राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. आतापासूनच निवडणुकीची तयारी सुरू केल्याने राजकीय पक्षांना त्याचा लाभ मिळणार आहे. जम्मू काश्मीरमध्ये निवडणुका होणार असतील तर त्याचे सर्वसामान्य नागरिक स्वागतच करतील. आपल्या देशात लोकशाही आहे आणि निवडणूक हाच लोकशाहीचा पाया आहे. निवडणुकीद्वारेच मतदार आपले लोकप्रतिनिधी निवडून देतात. मागील काही वर्षात जम्मू काश्मीरमध्ये निवडणुका झाल्या नव्हत्या त्या जर झाल्या तर जम्मू काश्मीरमध्येही लोकशाहीची नवी पहाट उगवेल यात शंका नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शेतकऱ्यांसाठी लढणारे बाबासाहेब



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**शेतात शेतकरी अणि भाजी मार्केटमध्ये ही शेतकरीच दिसायला हवेत.अशी शेतकरी हिताची संकल्पना मांडणारे तसेच शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी ब्रिटिशपूर्व काळात ही २५ हजार शेतकऱ्यांचा मोर्चा विधिमंडळावर घेऊन जाणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने ब्रिटिश पूर्व काळातील शेतकऱ्यांचे कैवारी बनले होते. शेती आणि शेतकऱ्याला पोषक असणारी संकल्पना ही अनेक शेतकरी सभांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितली.**



शेतकरी हा सुखी आणि समृद्ध होण्यासाठी त्याच्या मालाला योग्य भाव मिळावा.त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळावा. म्हणून ब्रिटिश यांच्यासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार हा कायम शेतकऱ्यांच्या हितालाच न्याय मिळवून देणारा होता. एवढेच नव्हे तर राज्यघटनेत ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी हिताचे कायदे तयार केलेले आहेत. परंतु सरकारी यंत्रणेतून त्या राज्यघटनेतील तरतुदी यांची अंमलबजावणी ही ज्या पद्धतीने व्हायला हवी आहेत. ती होताना दिसत नाहीत. पाण्याच्या नियोजनावर ही शेतकऱ्यांची शेती अवलंबून असते म्हणुन दुष्काळ सदृश्य परिस्थिती हटविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पाण्याचे नियोजन करण्याच्या उपायोजना ही आखल्या होत्या. पाण्याचे प्रकल्प उभारणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जलतज्ञ म्हणुनही ओळखले जातात. आज पाण्याच्या नियोजना अभावी आजचा शेतकरी हा अनेक समस्यामध्ये अडकून पडलेला आहे.शेतकऱ्यांचे शेती करण्याचे नियोजन फसते आहे. दुष्काळाची परिस्थिती दूर करण्याकरीता यंत्रणेने बाबासाहेब यांचेच पाणीविषयक आणि शेतीविषयक चे विचार हे सत्यात उतरविले पाहिजेत.

शेतकरी यानेच आपला माल हा मार्केट मध्ये घेऊन गेले पाहिजे. हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार हा शेतकरी यांच्या अडचणी सोडविणारा होता. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य असा मोबदला मिळवून देणारा होता. तसेच ग्राहकवर्ग यांना ही रोजची रोज ताजी तवानी भाजी मिळवून देणारा ही हा शेतकरीच असतो.शेतकरी यांच्या शेतातूनच अनेक धान्य ही पिकत असतात. आज शेती पिकविणाराच शेतकरी हा दारिद्रयात् आणि कमी भावाने शेतकऱ्यांचा माल घेणारा व्यापारी वर्ग हा मोठ्या भावाने माल विक्रिस नेहणारा धनवान झाला आहे. शेतात जो राबतो तोच खरा धनवान व्हायला हवा होता.परंतु ते चित्र आज उलटे झाले आहे. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार शेतकरी यांनी समजून घ्यायला हवा.

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळणारे शेतकऱ्यांचे ही नेते होते. हे आपल्या शेतकरी बांधवाला माहित ही नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे शेतकरी यांचे हितकर्ते होते. हे दुर्लक्षित करता येणार नाही. परंतू बाबासाहेब यांचे कार्य शेतकरी यांपर्यंत पोहचले पाहिजे.आजवर आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून त्यांच्याकडे पाहत आलेले आहोत.अस्पृश्य समाजाला एक नव्या प्रकाशाची नवी दिशा दाखविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्यांचे कैवारी, स्त्रियांचे मुक्तिदाते, दीन दुबळयांचे तारणहार, समस्त भारतीयांचे भारतरत्न,जगाला आदर्शवादी आणि प्रकांड कायदेपंडित, बुद्धिवादी ठरलेले विश्वभूषण आदी सर्व विशेषणे यांनी ते संपूर्ण मानव जातीला परिचित झालेले ते असामान्य असे व्यक्तिमत्व गणले आहेत. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर हे शेतकऱ्यांचे ही दुःख जाणणारे होते आणि त्यांच्यासाठी ही ताकतीने लढणारे नेते ही होते. या कार्याची ओळख होणे तितकेच महत्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी शेतकरी वर्गासाठी जे कार्य केले आहे. ते अजून ही येथील शेतकऱ्यांना याची कल्पना नसेल. शेतकऱ्यांसाठी ध्येय धोरणे राबविनारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचेच कैवारी होते. स्वातंत्र्यपूर्व काळात ही शेतकरी यांच्या हक्कांसाठी ब्रिटिशांविरोधात लढले. शेती आणि शेतकऱ्यांच्यासाठी मोठा संघर्ष त्यांनी उभा केला होता. त्यांनी शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद भूषवित ते शेतकऱ्यांच्या हककांसाठी खंबीर पणे उभे राहिले होते.

शेतकऱ्यांच्या क्रांतीची मशाल आपल्या हातांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२८ नंतरच घेतली होती.१४ एप्रिल १९२९ ला त्यांनी रत्नागिरी जिल्ह्यांतील चिपळूणमध्ये शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद भूषविले होते.

१९३६ ला कामगार वर्गांसाठी स्थापन केलेल्या



स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा हा शेतकऱ्यांचाच प्रश्न सोडविण्यासाठी तयार केला. हा जाहीरनामा शेतकऱ्यांची दुःखे आणि संकटे यांची अश्रू मांडणारा ठरला. त्यांनी ब्रिटिश यांपुढे ठेवलेल्या मागण्या जोपर्यंत पूर्ण होणार नाहीत. तोपर्यंत आपण आपल्या हककांचा लढ़ा हा असाच पुढे चालू ठेवला पाहिजे, असे आवाहन जमलेल्या शेतकरी वर्गाला त्यांनी केले होते. तुमची दुःखे ही अनेक आहेत. ती दूर करण्यास तुम्हीच तुमची कंबर कसली पाहिजे. त्यासाठी तुमची संघटना जितकी मजबूत कराल.तेवढेच तुमचे प्रश्न लवकर आणि सहजरित्या सोडवले जातील. असे मोलाचे मार्गदर्शन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १ जानेवारी १९३८ ला केले होते. महार वतनदारी निर्मूलन संदर्भात निर्माण केलेल्या परंपरागत सेवा कायद्यानुसार निम्नस्तरिय शासकीय कर्मचारी यांना २४ तास राबविले जात होते. तेव्हा त्यांच्या वर अशा पद्धतीने अन्याय केला जात होता. त्याबदल्यात त्यांना मोबदला म्हणुन लहानसा जमीनीचा तुकडा देण्यात येणार होता. परंतु तो तुकडा जिथे शेतीच पिकणार नाही. अशी शेती न पिकणारी जमीन देण्यात येणार होती. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वत लक्ष घालत.त्यांनी इथे न्याय मिळवून देण्याची भूमिका साकारली.त्यांच्यामध्ये जागरूकता आणण्याचे महान कार्य त्यावेळी बाबासाहेब यांनी केले. आर्थिक कार्यक्रमाचे नियोजन कसे असावे या विषयी ही १५ एप्रिल १९४७ ला त्यांनी मार्गदर्शन केले. आपला मुलभूत हकक उपसमितीत सादर केलेल्या प्रबंधातील काही योजना त्यासंदर्भातील महत्त्वाच्या आखल्या गेल्या आहेत. शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन योग्य असेल तर शेती ही योग्य होउ शकते, असा विश्वास त्यांना होता.

शेतकऱ्यांची आर्थिक घडी बसविन्याचे काम राज्य घटनेतील तरतुदी मध्ये करण्यात आलेले आहे. तुकडयांमध्ये वाटून केली गेलेली शेती ही तोट्यांमध्ये जाते हे बाबासाहेब यांनीही सांगितले होते.सामूहिक शेती करण्यास सांगितले.

सामूहिक शेती पद्धती,शासनाकडून निगराणी, कर्ज रोखे,पैशाची परत फेड या सोबतच शेती व् महत्वाचे उद्योग राष्ट्राच्या मालकीचे व्हावेत सर्वसामान्य व्यक्तिपासून ते देशाच्या हिताचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने आधारित योजना आखल्या.स्वतंत्र मजूर पक्षाचा १९५१ चा निवडणूक जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला. त्यावेळी त्यांनी या जाहिरनाम्यात शेतीचे यांत्रिकरण झाले पाहिजे.परंपरागत शेती करीत असलेल्या पद्धतीत बदल झाला पाहिजे असे जाहिर केले.शेती उत्पादनावर शेतसारा सामूहिक शेतीच्या तत्वांवर बाधा आणणाऱ्या सभासदास योग्य ती शिक्षा देणे अशा अनेक कृषी हिताच्या कल्पना त्यांनी दिल्या. पुढे याच विचारांचा ही उपयोग योजना बनविण्या झालेला आहे.शेती व् शेतकऱ्यांच्या हिताचे त्यांचे रक्षणाचे व् लाभाचे कायदे ही बनविले गेले.परंतु कायदे हे ठोस अंमलबजावनीत न करण्यातच अडकून पडले. कोकणातील शेतकऱ्यांची खोतांच्या जाचातुन मुक्तता मिळावी म्हणुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३७ साली मुंबई विधीमंडळात कायद्याचे विधेयक मांडले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे फक्त अस्पृश्य यांच्या लढयाचेच नेतृत्व करीत नव्हते तर इथल्या कष्टकरी मजूर आणि शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न ही जाणुन होते.म्हणुन त्यांनी विधिमंडळावर शेतकरी यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधुन घेण्यासाठी १० जानेवारी १९३८ साली २५ हजार शेतकऱ्यांचा मोर्चा काढला. पुढे त्याचे नेतृत्व स्वत आंबेडकर करीत असलेल्या मोर्च्याला ही यश मिळाले होते.कोकण दौऱ्याची पाहणी या मोर्च्याने यंत्रनेकडून घडवून आणली.शेतकऱ्यांच्या हिताचे कार्य करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आज ही समस्त शेतकरी वर्गांसाठी प्रेरणा देणारे प्रेरणा स्त्रोतच आहेत.त्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या सक्षम शेतीसाठी बाबासाहेब यांची शेती विषयक ध्येय धोरणे अभ्यासली पाहिजेत.

# जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणीची गरज



कृष्णा चांदगुडे

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. अन्य कोणत्याही राज्याला नाही,अशी लखलखीत परंपरा आपल्या राज्याला आहे. अनेक संत व थोर समाज सुधारक येथे होऊन गेले. त्यांनी इतर कामासोबत समाजातील अनिष्ट चालीरिती,अंधश्रद्धा दुर व्हाव्यात यासाठी अटोकाट प्रयत्न केले. या परंपरेचा आभिमान राखत व देव धर्माला विरोध न करता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती हेच काम करत आहे. जादुटोणा विरोधी कायदा राज्यात लागू व्हावा, यासाठी सलग अठरा वर्ष समितीने प्रयत्न केले. सरकारने या कायद्याचे विधेयक तयार केले परंतु अनेक वर्ष ते संमत झाले नाही. कायदा व्हावा यासाठी लोकशाही मार्गाने अंदोलने करत अंनिसने सरकारकडे हा विषय लावून धरला. सन २०१३ सालात डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनानंतर महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा लागू झाला. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या कायद्याला नऊ वर्ष पुर्ण झाले असुन या कायद्याअंतर्गत दीड हजाराहून अधिक गुन्हे दाखल झाले आहे. हा कायदा केवळ हिंदु धर्मातील लोकांना लागू पडेल असा आरोप काही लोकांनी केला होता व आजही करत आहे.**

परंतुहा कायदा सर्व धर्मासाठी लागु आहे. पहिला गुन्हा मुस्लिम भोंदुच्या विरोधात नांदेड येथे तर दुसरा गुन्हा नाशिक रोड येथे नवबौद्ध समाजातील आरोपीच्या विरोधात दाखल झालेला आहे.

नंतर हिंदु आरोपीच्या विरोधात दाखल झाला आहे. पहिल्या शंभर गुन्ह्यांची नोंद महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ठेवली आहे. त्यात शंभर पैकी वीस घटनांमध्ये मुस्लिम व्यक्तींच्या विरोधात गुन्हे दाखल झाले आहे. लोकसंख्येचा विचार करता हे प्रमाण लक्षणीय आहे. त्यामुळे या कायद्याबाबत गैरसमज पसरविण्यांना कृतिशील उत्तर मिळाले आहे.

महाराष्ट्र राज्यातील नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत 'अधिनियम २०१३' असे या कायद्याचे नाव आहे. या अंतर्गत दाखल गुन्हा हा दखलपात्र व अजामीनपात्र आहे. दोष सिध्द झाल्यावर सहा महिने ते सात वर्ष शिक्षेची तरतुद या कायद्यात आहे. त्यासोबतच पाच हजार ते पन्नास हजार इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेचीही यात तरतुद आहे. दक्षता आधिकाऱ्यांची नेमणूक ही या कायद्याने केली आहे. नरबळी देणे अथवा देण्याचा प्रयत्न करणे, करणी भानामती, जादूटोणा अथवा भुत उतरवण्याच्या बहाण्याने अंगाला चटके देणे, त्यासाठी जबरदस्तीने मानवी विष्ठा खाऊ घालणे, तोंडात कोंबणे, मारहाण करणे, चमत्काराचा दावा करून स्त्रींयांचे लैंगिक शोषण करणे, गुप्तधन काढण्याच्या हेतुने अघोरी प्रथांचा अवलंब करणे, दैवी शक्तींचा दावा करून महिलांना नग्नपूजा करण्यास जबरदस्ती करणे, डाकिण समजुन त्रास देणे, पैशाचा पाऊस पाडण्याच्या बहाण्याने फसवणूक करणे आदी अमानुष घटनांमुळे या कायद्यांतर्गत गुन्हे नोंद झाल्याचे दिसून येत आहे.

महाराष्ट्राने देशाला दिशादर्शक अनेक कायदे दिले आहे. तसाच हा कायदा देशासाठी पथदर्शक आहे. अनेक राज्यांतून असा कायदा व्हावा अशी मागणी होत आहेत. परंतू देशाने आदर्श घ्यावा



अशा या कायद्याची अगोदरच राज्यातच प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. विविध कारणांमुळे तक्रार करण्यासाठी अनेकजण पुढे येत नाही. बदनामी होईल अशा भितीमुळे बरेच पिडीत तक्रार करण्याचे टाळतात. पोलीसांकडून फारसे सहकार्य मिळत नाही. कारण त्यांचाही या कायद्याबाबत संभ्रम आहे. त्यामुळे पोलीस ते पोलीस पाटील यांची नियमित प्रशिक्षण शिबिर होणे आवश्यक आहे. हे प्रबोधनज्या प्रमाणे शाळा-महाविद्यालयांतुन होऊ शकते त्याचप्रमाणे भाषणे, शिबीर, किर्तन, प्रवचन, मनोरंजनाची साधने यातुन होऊ शकते. कायद्याबाबतचे गैरसमज दुर होण्यासाठी शासनाकडून प्रयत्न झाले पाहिजेत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या कायद्याचा प्रचार प्रसार करत आहे. मात्र मर्यादा व क्षमता याचा विचार केल्यास हे प्रयत्न अपुरे आहे. तरी या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा व या कायद्याचे नियम बनवावेत व कायदा अधिक कडक करावा, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केली आहे.

**(लेखक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यवाह आहेत)**

# ब्रिटिशांना सैनिकांची मुंडकी पाठवली !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी


**क्रांतिवीर राजे उमाजी नाईक हे भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध लढणारे महाराष्ट्रातील प्रथम आद्यक्रांतिकारक होते. आज ३ फेब्रुवारी हा या महान आद्यक्रांतिकाराचा स्मृतिदिन. रामोशी-बेरड समाजाशिवाय कोणाच्याच नेहमीप्रमाणे तो लक्षात राहत नाही. त्यामुळे राजे उमाजी नाईक फक्त रामोशी-बेरड समाजापुरते मर्यादित असल्यासारखे होत आहे. पण सर्व जाती-धर्मांनी हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ही आठवण करून देणारा अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा लेख.**

क्रांतिकारकांचा आदर आणि त्यांचे स्मरण सर्वच जातिधर्मातील लोकांनी केले पाहिजे. मग हे राजे उमाजी नाईक असे उपेक्षितच का राहून गेले? हे आश्चर्य आहे. अशा या धाडसी उमाजीराजेंनंतर तब्बल १३ वर्षांनी- सन १८४५ला क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके जन्माला आले. त्यांनी उमाराजेंचे धोरण डोळ्यासमोर ठेवत ३०० रामोशांना सोबत घेऊन बंड सुरू केले. त्यावेळी दौलती रामोशी हा त्या बंडाचा सेनापती होता. नरवीर उमाजीराजे स्वतःच्या कार्याने एक दीपस्तंभ ठरले आहेत. त्यांचा गौरव करण्यापासून इंग्रज अधिकारीही स्वतःला रोखू शकले नाहीत. इंग्रज अधिकारी कॅप्टन रॉबर्टसन याने १८२०ला ईस्ट इंडिया कंपनीला लिहिताना म्हटले, "उमाजीचा रामोशी समाज इंग्रजांविरुद्ध तिरस्काराने पेटला असून तो कोणत्या तरी राजकीय बदलाची वाट पाहत आहे. जनता त्यांना मदत करत असून कोणी सांगावे, हा उमाजी राजा होऊन छ.शिवाजीसारखे राज्य तर स्थापणार नाही ना?" तर मॉकिनटॉस म्हणतो, "उमाजीपुढे छ.शिवरायांचा आदर्श होता. त्याला फाशी दिली नसती तर तो दुसरा शिवाजी झाला असता." हे केवळ गौरवोद्गार नसून हे सत्य आहे... जर इंग्रजांनी कूटनीती आखली नसती तर कदाचित तेव्हाच भारताला स्वातंत्र्य मिळाले असते. भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत. काहींची नोंद झाली, काहींची दखलच घेण्यात आली नाही. सन १८५७च्या उठावापूर्वीही अनेक उठाव झाले. अशाच पहिल्या उठावाद्वारे इंग्रजांना सलग १४ वर्षे सळो की पळो करून सोडणारे व सर्व प्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारे महाराष्ट्रातील निधड्या छातीचे वीर आद्यक्रांतिकारक नरवीर ठरले गेले. ज्यांना इंग्रजांचा कर्दनकाळ म्हणूनही ओळखले जाते. ते म्हणजे राजे उमाजी नाईक!

नरवीर उमाजीराजे नाईक-खोमणे यांचा जन्म रामोशी-बेरड समाजात लक्ष्मीबाई व दादोजी खोमणे यांच्या पोटी दि.७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील किल्ले पुरंदर येथे झाला. वडिल दादोजी खोमणे पुरंदर किल्ल्याचे वतनदार होते. त्यामुळे उमाजीराजेंचे कुटुंब पुरंदर व वज्रगड किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत होते. त्यामुळेच त्यांना नाईक ही पदवी मिळाली होती. उमाजीराजे जन्मापासूनच हुशार, चंचल, शरीराने धडधाकट, उंचपुरे आणि करारी होते. त्यांनी पारंपरिक रामोशी हेर कला लवकरच आत्मसात केली. जसे राजे मोठे होत गेले, तसे त्यांनी वडीलांकडून दांडपट्टा, तलवार, भाला, कुऱ्हाड, तीरकमठा, गोफण वगैरे चालवण्याची कला अवगत केली. या काळात इंग्रजांनी भारतात आपली सत्ता स्थापन करण्यास सुरूवात केली होती. हळूहळू मराठी मुलुख जिंकत त्यांनी पुणे ताब्यात घेतले. इ.स.१८०३मध्ये पुण्यात दुसऱ्या बाजीराव पेशव्यास स्थानापन्न केले आणि त्याने इंग्रजांचा पाल्य म्हणून काम सुरू केले. सर्वप्रथम त्याने इतर सर्व किल्ल्यांप्रमाणे पुरंदर किल्ल्याच्या वतनदारीचे व संरक्षणाचे काम रामोशी समाजाकडून काढून घेऊन आपल्या मर्जीतील लोकांकडे दिले. त्यामुळे रामोशी समाजावर उपासमारीची वेळ आली. जनतेवर इंग्रजी अत्याचार वाढू लागले. अशा परिस्थितीत करारी उमाजीराजे बेभान झाले. छत्रपती शिवरायांना श्रद्धास्फूर्तीचे स्थान देत त्यांचा आदर्श घेतला. स्वतःच्या अधिपत्याखाली स्वराज्याचा पुकार करत आपल्या देशावर परकीयांना राज्य करू देणार नाही, असा पण केला. विठोजी नाईक, कृष्ण नाईक, खुशाबा रामोशी, बाबू सोळस्कर यांना बरोबर घेऊन कुलदैवत जेजुरीच्या श्री खंडोबारायाला भंडारा उधळत शपथ घेतली व इंग्रजांविरोधात पहिल्या बंडाची गर्जना केली.

उमाजीराजे नाईक यांनी इंग्रज, सावकार, मोठे वतनदार अशा लोकांना लुटून गोरगरिबांना आर्थिक मदत करण्यास सुरवात केली. कोणत्याही स्त्रीवर अत्याचार- अन्याय झाल्यास ते भावासारखे धावून जाऊ लागले. इंग्रजांना त्रास दिल्यामुळे त्यांना सरकारने इ.स.१८१८मध्ये एक वर्ष तुरुंगवासाची शिक्षा दिली. परंतु तो काळ सत्कारणी लावत ते तुरुंगातच लिहिणे-वाचणे शिकले. या घटनेचे इंग्रज आधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस याने फार आश्चर्य व कौतुक केले. तुरूंगातून सुटल्यानंतर इंग्रजांविरुद्ध त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. ते देशासाठी लढत असल्याने जनताही त्यांना साथ देऊ लागली. त्यामुळे इंग्रज मेटाकुटीला आले. त्यांना पकडण्यासाठी इंग्रज अधिकारी मॉकिनटॉस याने सासवड-पुरंदरच्या मामलेदारास फर्मान सोडले. मामलेदार इंग्रजी सैन्य घेऊन पुरंदरच्या पश्चिमेकडील एका खेड्यात गेला असता, तेथे त्यांच्यात आणि उमाजीराजेंच्या सैन्यात तुंबळ युद्ध झाले. यात इंग्रजांना पराभव स्वीकारावा लागला. उमाजीराजेंचे सैन्य डोंगरात टोळ्या करून राहत असत. एका सैन्य तुकडीत जवळजवळ ५ हजार सैनिक होते.

इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रुशी मुकाबला करायचा म्हणजे मोठे मनुष्यबळ असायला हवे. म्हणजेच सैन्य व प्रचंड खर्च आलाच. पण उद्देश महान असल्यामुळे ते साधनाअभावी थांबले नाहीत. ते छ.शिवाजी महाराजांना आदर्श मानत. असे खुद्द इंग्रज आधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस याने नमूद केले आहे. दि.२४ फेब्रुवारी १८२४ला नरवीर उमाजीनी



भाबुड्री येथील इंग्रज खजिना लुटून तो देवळाच्या देखभालीसाठी जनतेला वाटला होता. दि.२२ जुलै १८२६ साली त्यांचा राज्याभिषेक कडेपठार, जेजुरी या ठिकाणी करण्यात आला. त्यांनी छत्रचामर, अबदागीर, इ.राजचिन्हे धारण केली. दरबारात ते भिक्षुक-पुजारी यांना दक्षिणा व गोरगरिबांना दान देत असत. त्यांनी विभागनिहाय सैन्य प्रमुख व त्यांच्या तुकड्या नेमून सर्व भागात त्या तैनात केल्या होत्या. त्यांना कामे वाटून दिली होती. तसेच त्यांनी एकमेकांशी संपर्क, दळणवळण, इंग्रजांच्या बातम्या तसेच लोकांचा बातम्या, इ.कामासाठी हेरखातेही निर्माण केले होते. विभागनिहाय गुप्तहेरखाते नेमले होते. सैन्यात व गुप्तहेरखात्यात सर्व जाती-धर्माचे लोक होते. त्याच साली २८ ऑक्टोबरला त्यांच्याविरुद्ध इंग्रजांनी पहिला जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यात उमाजीराजे व त्यांचा साथीदारांना पकडणाऱ्यास मोठ्या रकमेची बक्षिसे व इनाम जाहिर केले. या क्रांतिकारकांना मदत करणाऱ्यास शिक्षाही जाहीर केली. पण जनतेने इंग्रजांना मदत केली नाही. यातून उमाजीराजेंची लोकप्रियता दिसून येते. अशाच प्रकारे दुसरा जाहिरनामा इंग्रजांनी दि.८ ऑगस्ट १८२७ साली प्रसिद्ध केला. त्यात बक्षिसाची रक्कम वाढवली व शरण येणाऱ्यास माफी देण्याचे अभिवचन देण्यात आले. तरीही कोणी मदत केली नाही. कारण लोक उमाजीराजेंना इंग्रजांविरुद्ध एक आशास्थान म्हणून पाहू लागले होते. पुढे २० डिसेंबरला झालेल्या युद्धात इंग्रजांना पराभव पत्करावा लागला. उमाजीराजेंनी ५ इंग्रज सैनिकांची मुंडकी कापून मामलेदाराकडे खलिता म्हणून पाठवली. त्यामुळे इंग्रज चांगलेच धास्तावले. कैप्टन डेव्हिसपासून लेफ्टनंटपर्यंत सर्वच लालबुंद झाले. नंतर ३० नोव्हेंबरला इंग्रजांना त्यांनी ठणकावून सांगितले की, आज हे एक बंड असले तरी असे हजारो बंड सातपुड्यापासून सह्याद्रीपर्यंत उठतील व तुम्हास जेरीस आणतील. फक्त इशारा देऊन न थांबता त्यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. इंग्रजांनी तिसरा जाहिरनामा प्रसिद्ध करून बक्षिसाची रक्कम दुप्पट केली. त्याचाही काही उपयोग झाला नाही. जंजिऱ्याचा सिद्दी नवाबने उमाजीराजे कोकणात गेले असताना त्यांना मदत मागितली होती. दि.२४ डिसेंबर १८३०ला त्यांनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्यावर मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवत घायाळ करून परत पाठवले होते. त्यात काहींचे प्राणही घेतले. दि.२६ जानेवारी १८३१ साली इंग्रजांनी चौथा जाहिरनामा प्रसिद्ध केला, की त्यांना पकडून देणाऱ्यास ५००० रुपये रोख बक्षिस व २०० बिघे- १०० एकर जमीन जाहिर करण्यात आली. पण तरीही कोणीही इंग्रजांना मदत केली नाही. अशा प्रकारे त्यांच्या भारताच्या स्वातंत्र्यलढ्यास सर्व राजे-रजवाडे, संस्थानिक, जनता पाठिंबा देत होते.

उमाजीराजेंनी दि.१६ फेब्रुवारी १८३१ रोजी इंग्रजी सत्तेविरुद्ध एक जाहीरनामाच प्रसिद्ध केला. त्यात नमूद केले होते, की लोकांनी इंग्रजी नोकऱ्या सोडाव्यात. सर्व राजे-रजवाडे, सरदार, जमीनदार, वतनदार, देशवासीयांनी एकाच वेळी एकत्र येऊन जागोजागी बंड पुकारावे आणि इंग्रजांविरुद्ध अराजकता माजवावी. इंग्रजांचे खजिने लुटावेत. इंग्रजांना शेतसारा, पट्टी देऊ नये. असे करणाऱ्यास नवीन सरकारमधून जहागिरी, इनामे वा रोख पैशाची बक्षीसे मिळतील. ज्यांची वंशपरंपरागत वतने, तनखे इंग्रज सरकारमुळे गेले असतील ती सर्व त्यांना परत केली जातील. इंग्रजांची राजवट आता लवकरच संपुष्टात येणार आहे व नवीन न्यायाधिष्ठीत राज्याची स्थापना होइल. इंग्रजांना कोणीही मदत करू नये. तसे केल्यास नवीन सरकार त्यांना शासन करेल, असे सांगून उमाजीराजेंनी एकप्रकारे स्वराज्याचा पुकारच केला होता. संपूर्ण क्रांतिकारकांच्या इतिहासात अशा प्रकारचा व्यापक जाहिरनामा प्रथमच दिसतो. हे भारताच्या इतिहासातील सोनेरी पानच आहे. म्हणूनच उमाजीराजे हे आद्यक्रांतिकारक ठरतात. तेंव्हापासून उमाजी हे जनतेचे राजे बनले. या सर्व प्रकारामुळे इंग्रज गडबडले आणि त्यांनी उमाजीराजेंना पकडण्यासाठी युक्तीचा वापर केला. सावकार, वतनदार यांना मोठमोठी आमिषे दाखवण्यात आली .इंग्रजांनी उमाजीराजेंविरुद्ध पाचवा जाहिरनामा प्रसिद्ध केला. माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये रोख आणि चारशे बिघे जमीन बक्षीस देण्याची घोषणा केली. हा इनाम त्या काळात अगनित होता. देशद्रोही त्र्यंबक चंद्रस कुलकर्णी हा फितूर होऊन उमाजींराजेंची सर्व गुप्त माहिती इंग्रजांना दिली. दि.१५ डिसेंबर रोजी भोर तालुक्यातील उतरोली या गावी रात्री बेसावध असताना त्यांना इंग्रजांनी पकडले. पुण्यात मामलेदार कचेरीतील एका काळ्या खोलीत त्यांना ३५ दिवस ठेवण्यात आले. अशा या खोलीत ते असताना त्यांना पकडणारा इंग्रज अधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस दररोज त्यांची माहिती घेत होता. त्यानेच उमाजीराजेंची सर्व हकीकत लिहून ठेवली आहे. उमाजीराजेंवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला आणि या नरवीरांना न्यायाधीश जेम्स टेलर यांनी दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली. देशासाठी बलिदान देणारे पहिले नरवीर उमाजीराजे नाईक दि.३ फेब्रुवारी १८३२ला पुण्याच्या खडकमाळ आळी येथील मामलेदार कचेरीत वयाच्या ४३व्या वर्षी हसत हसत फासावर चढले. जीवंतपणी सतत ताठ राहिलेली मान जीव गेल्यानंतरच वाकली. इतरांना दहशत बसावी म्हणून त्यांचे प्रेत कचेरीच्या बाहेर पिंपळाच्या झाडाला तीन दिवस लटकवून ठेवले होते. उमाजीराजेंसोबत इंग्रजांनी त्यांचे साथीदार खुशाबा नाईक आणि बापू सोळस्कर यांनाही फाशी दिली.

!! त्यांच्या अचाट देशभक्तीपर स्मृतींना संपूर्ण सप्ताहभर मानाचा लवून मुजरा !!

# निरर्थक बडबड करणाऱ्यांविरोधात नव्या कायद्याची गरज

आधुनिक केसरी

जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज यांना त्यांची पत्नी रोज मारत असे म्हणून ते देवावर प्रेम करु लागले, असे वादग्रस्त विधान धर्मेंद्र शास्त्री तथा बागेश्वर महाराजांनी केले आहे. त्यामुळे संपूर्ण वारकरी संप्रदायासह राज्यामध्ये संतापाची लाट उसळली आहे "समाजाला अंधश्रद्धेपासून दूर लोटून भक्तीच्या मार्गावर आणणारे संत म्हणजे श्री तुकोबाराय, आईसाहेब जिजाई यांचे इतकी थोर पतिव्रता पाहता येणे दुर्मिळ. आयुष्यभर आपल्या पतीने भोजन केल्याशिवाय ज्या माऊलीने भोजन केलं नाही, त्या माऊली विषयी असे बेताल वक्तव्य करणे निश्चितच महाराष्ट्रासाठी लाजीरवाणी गोष्ट आहे तुकारामांना वारकरी 'जगद्गुरू' म्हणून ओळखतात. वारकरी संप्रदायातल्या प्रवचन व कीर्तनाच्या शेवटी - 'पुंडलीक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय' असा जयघोष करतात. जगद्गुरू तुकाराम लोककवी होते. 'जे का रंजले गांजले! त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा! देव तेथेची जाणावा!' अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना सांगून ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखवला. वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. सतराव्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाचे मुहूर्तमेढ रोवणारे सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातो. तुकाराम महाराज वास्तववादी निर्भीड आणि वेळप्रसंगी समाजातील दांभिकपणावर रोखठोक शब्दांमध्ये प्रहार करणारे संत होते. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये या काळात



अनागोंदी निर्माण झालेली होती. अशा काळात संत तुकारामांनी आपल्या साहित्यातून व कीर्तनांतून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे महानकार्य केले. अशा संत महात्म्याविषयी बागेश्वर महाराजानी केलेले व्यक्तव्य निषेधार्ह आहे सद्या महाराष्ट्रामध्ये कोणीही यावे आणि महापुरुषांबाबत बेताल वक्तव्ये करुन जावे अशी चढाओढ लागलेली आहे की काय ? असा प्रश्न निर्माण झाला आहे त्यासाठी अशी बेताल आणि निरर्थक बडबड करणाऱ्या व्यक्तींवर लगाम घालण्यासाठी राज्यांतील आगामी अधिवेशनात नवा कायदा करण्यासाठी सकारात्मक विचार होणे गरजेचे बनले आहे !!

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# बार्टी तो बस झाकी हैं! वर्गीकरण अभी बाकी हैं!

आधुनिक केसरी

**मातंग समाज बांधवांमध्ये काही दिवसांपासून शैक्षणिक जागृती होऊ लागली आणि यातून प्रामुख्याने दोन मागण्या समोर आल्या. त्या म्हणजे अनुसूचित जाती आरक्षणाचे वर्गीकरण होऊन आरक्षण लाभ वंचित जातींना शैक्षणिक व नोकरी मध्ये लोक संख्येच्या प्रमाणात आरक्षित जागा मिळाव्यात तसेच प्रशासकीय सेवेत संधी मिळावी म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन संस्थेच्या माध्यमातून मातंग व तत्सम जात बांधावाना प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी बार्टीच्या धर्तीवर आर्टीची अर्थात अण्णा भाऊ साठे संशोधन संस्थेची निर्मिती व्हावी.**

शासनाने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन व प्रशिक्षण देऊन प्रशासकीय सेवेच्या प्रशिक्षण देण्यासाठी बार्टीची निर्मिती केलीण. मात्र तीस पस्तीस वर्षात मातंग व तत्सम जातीच्या विद्यार्थ्यांना या संस्थेच्या माध्यमातून संधी मिळाली नाही. या संस्थेतील अधिकाऱ्यांनी क्रांतिगुरु लहूजी साळवे, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. आंबेडकर व सत्यशोधक अण्णा भाऊ साठे यांनी मांडलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्वाला हरताळ फासण्याचे काम सुरू केले. त्यातून मातंग समाजातील सुशिक्षित तरुणांकडून स्वतंत्र आर्टीची मागणी होऊ लागली. त्याचप्रमाणे बार्टीच्या गैर व्यवहारावर उघडपणे लाभ वंचित जात समूह प्रश्न विचारू लागला.

आजपर्यंत या संस्थेत एका विशिष्ट जात समूहाची मक्तेदारी असल्याने कितीही विरोध झाला तरी तो पद्धतशीर मोडून काढला गेला असेच दिसते. त्यामुळेच या संस्थेमध्ये अद्यापतरी वंचित घटकांना संधी मिळाली नाही. या संस्थेच्या वतीने शेवटच्या वंचित घटकाला न्याय देणे हे उद्दिष्ट असताना देखील कधीच हे उद्धिष्ट पूर्ण झाले नाही हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे.

नुकतीच या संस्थेच्या महासंचालकपदी मातंग समाजाचे उच्चपदस्थ अधिकारी सुनील वारे यांची नियुक्ती जाहीर झाली आणि मातंग समाजबांधवांना अर्धी लढाई जिंकल्याचा आनंद झाला. मात्र या नियुक्तीला लगेचच स्थगिती मिळवली गेली आणि मातंग तसेच लाभवंचित घटकातील तोंडचे पाणी पळाले. कोट्यवधी रुपयांचा घोटाळा व अनेक आर्थिक गैरव्यवहार कदाचित या नियुक्तीतून उघड झाले असते. त्यामुळे सर्वोतोपरी प्रयत्न करूनही नियुक्ती थांबवली




गेली. जर आपल्या हक्कांवर गदा आणून आमच्या हक्काची भाकरी कोणी अन्याय करून ओरबडून खात असेल आणि त्यावेळी वंचित घटक आपल्या न्याय्य मागणी करीता संघर्ष करत असेल तर प्रबळ घटक हे आंदोलन मोडून काढत आहेत आणि काढत राहतील यात शंका नाही.

आता फक्त बार्टीमधील हक्क मागत असताना एवढा मोठा विरोध होत असेल तर वर्गीकरणाची मागणी प्रत्यक्षात येताना किती विरोध होईल याची यावरून कल्पना येते. त्यामुळे समाजातील नेते, कार्यकते, नोकरदार, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी यांनी आरक्षण वर्गीकरणाच्या मागणीसाठी एकजूट होऊन महाराष्ट्रात मोठे जन आंदोलन उभे करून लढा गतिमान करणे अपेक्षित आहे, नाहीतर येणाऱ्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत. जोपर्यंत मातंग समाज व लाभवंचित जातसमूह एकत्र येणार नाही तोपर्यंत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील न्याय, समता, बंधूत्वाचे मूल्ये समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पाझरणार नाहीत, म्हणून बार्टी तो एक झाकी है ! वर्गीकरण अभि बाकी है! आगामी काळात सर्व आघाड्यावर लढ्यासाठी तयार राहावे हीच अपेक्षा

**ॲड. नितीन पोळ**
**(लोक स्वराज्य आंदोलन, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष) संपर्क : 9860733420**

# ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज : जयंती विशेष



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**काय वर्णू आता गोंदवल्याची ख्याती, जेथे प्रगटली चैतन्य मूर्ती... शांती सुखाचे जणू हे माहेर, अष्ट प्रहर येथे नामाचा गजर, रामनामी पावन झाली इथली माती, जेथे प्रगटली चैतन्य मूर्ती... असे ज्या गोंदवलेचे वर्णन केले जाते आणि जेथे सतत राम नामाचा जप सुरू असतो, भाविकांचा दर्शनासाठी ओघ असतो अशी ही गोंदवले नगरी म्हणजे संतांची भूमीच आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे.**

येथे होऊन गेलेल्या श्री ज्ञानेश्वरमहाराज, श्री तुकाराममहाराज, श्री समर्थ रामदास स्वामी व श्री एकनाथ महाराज आदि संताच्या मांदियाळीत शोभून दिसतील, अशा संतांपैकी एक म्हणजे श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर! त्यांची जन्मभूमी म्हणजे सातारा जिल्ह्यातील गोंदवले बुद्रुक हे छोटेसे गाव. पण त्यांच्या जन्माने आणि वास्तव्याने आज महाराष्ट्रातच काय पण साऱ्या भारतातही ते पुण्यक्षेत्र म्हणून प्रसिध्द् आहे.

श्री महाराजांच्या घराण्यात पंढरीची भक्ति आणि वारी सात पिढ्या चालत आलेली होती. अशा या सात्त्विक कुटुंबात रावजी आणि सौ . गीताबाई या जोडप्याचे पोटी बुधवार माघ शुद्ध द्वादशी शके १७६६ (इ.स.१९ फेब्रुवारी १८४५) या दिवशी सूर्योदयाच्या सुमारास श्रीमहाराजांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा लिंगोपंत आणि सौ. राधाबाई यांना तर अत्यानंद झाला. पाळण्यात नाव गणपति असे ठेवले. हे गौरवर्णी गुटगुटीत आनंदी बाळ साहजिकच सर्वप्रिय झाले. बाळ थोडे मोठे होताच त्याच्या अंगचे अलौकिक गुण प्रकट होऊ लागले. भगवद्‌भजनाची अतोनात आवड, एकपाठीपणा, तसेच अन्नदानाचे अतीव प्रेम आणि दीनदुबळ्यांचा कळवळा पाहून आजोबा धन्य झाले.

पुढे योग्य वेळी मुंज झाल्यावर गणूने उपाध्यायांकडून त्यांची सारी विद्या अगदी अल्पावधीतच आत्मसात केली. अध्यात्माची ओढ वाढतच होती, आणि अखेर नवव्या वर्षीच दोन सोबत्यांसह गणूने गुरुशोधार्थ घरातून पलायन केले . पण त्यांचा लवकरच शोध लागला आणि हा प्रयत्न विफल झाला. अकराव्या वर्षी गणूचा विवाह करण्यात आला . त्यानंतर लवकरच आजी व आजोबा दोघेही स्वर्गवासी झाले. पुढे योग्य वेळी मुंज झाल्यावर गणूने उपाध्यायांकडून त्यांची सारी विद्या अगदी अल्पावधीतच आत्मसात केली. इकडे गुरुभेटीची तळमळ वाढतच होती. त्यांच्या ठिकाणी जन्मतःच अत्यंत तीव्र अध्यात्म वृत्ती होती. श्री एकनाथ व श्री समर्थ यांच्याप्रमाणे अगदी लहानपणापासून आपल्या जीवित कार्याची स्पष्ट जाणीव त्यांना होती. ब्रह्मज्ञानाचे आपले ध्येय गाठण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. व अखेर, वयाच्या बाराव्या वर्षी आईला किंचितशी सूचना देऊन स्वारीने एके रात्री गुपचूप फक्त एका लंगोटीनिशी प्रयाण केले, आणि गुरुशोधार्थ भारतभ्रमण सुरु केले.

या भ्रमणात श्रीमहाराजांनी तत्कालीन बहुतेक संतांच्या भेटी घेतल्या. हरिपूर (सांगली) येथील साध्वी राधाबाई, मिरजेचे सत्पुरुष आण्णाबुवा, सटाण्याचे देव मामलेदार, अक्कलकोटचे श्रीस्वामी , हुमणाबादचे माणिक प्रभु , काशीचे तैलंगस्वामी, दक्षिणेश्वरचे श्रीरामकृष्ण परमहंस, आदि सर्वांनी अतिप्रेमाने त्यांना जवळ केले, पण 'तुझे गुरुपद माझेकडे नाही' म्हणून सांगितले. अखेर गोदातीरी श्रीसमर्थसंप्रदायी श्रीरामकृष्ण यांनी दर्शन देऊन येहळेगांवच्या श्रीतुकारामचैतन्यांकडे जाण्यास सांगितले. तेथे गेल्यावर मात्र त्यांना पूर्ण समाधान झाले. नऊ महिने तेथे त्यांनी अविरत, अविश्रांत गुरुसेवा केली. गुरूंनी खडतर कसोट्या घेऊन त्यांची देहबुद्धि पूर्णपणे नष्ट झाल्याची खात्री करून घेतली, अखेर संतुष्ट होऊन अनुग्रह केला आणि ब्रह्मचैतन्य असे नाव ठेवले. मनासारखा सद्‌गुरु भेटल्यावर त्याने सांगितलेल्या मार्गाने जाऊन वयाच्या केवळ पंधराव्या वर्षी त्यांनी पूर्ण सिद्धावस्था प्राप्त करून घेतली. 'आत्मज्ञान अंगी मुरविण्यासाठी दोन वर्षे नैमिषारण्यात आत्मचिंतनासाठी जावे आणि मुख्य तीर्थक्षेत्र करून मग घरी जावे' ही गुरुआज्ञा शिरसावंद्य करून ते निघाले

श्री तुकामाईंच्या सांगण्याप्रमाणे तीर्थाटन करून ९ वर्षांनी गोंदवल्यास जाऊन घरी प्रकट झाले. सर्वांना आनंदीआनंद झाला. नऊ वर्षे आपली वाट पाहणाऱ्या पत्नीला ते माहेराहून घेऊन आले. पुढे तिच्यासह पुनः गुरुदर्शनास गेले, आणि नाशिक येथे सुमारे सहा महिने वास्तव्य करून त्यांनी तिची नामस्मरणात व ध्यानधारणेत उत्कृष्ट तयारी करून घेतली. वर्षभरानंतर तिला पुत्ररत्न झाले, पण लवकरच तो मुलगा देवाघरी गेला, आणि पाठोपाठ ती स्वतःही वैकुंठवासी झाली. त्यानंतर काही काळाने आईच्या आग्रहाखातर त्यांनी पुनः विवाह केला, तो एका जन्मांध मुलीशी! यांना पुढे भक्तमंडळी 'आईसाहेब 'म्हणू लागली. पुढील काळात श्रीमहाराजांनी श्रीरामनामाचा प्रसार करण्याचे व सामान्य प्रापंचिकांना पेलेल असा परमार्थमार्ग दाखविण्याचे कार्य अधिकच जोराने केले. सदाचार, नामस्मरण, सगुणोपासना, अन्नदान आणि सर्वांबद्दल प्रेमभाव, यांवर त्यांचा विशेष भर होता. सन १८९० पासून श्रींचे वास्तव्य प्रामुख्याने गोंदवले येथेच राहिले. त्यांच्याकडे येणा येणाऱ्यांची व राहणाऱ्यांची संख्या खूपच वाढली. या सर्वांना सगुणोपासनेला व सेवेला एक केंद्रस्थान असावे या हेतूने त्यांनी आपल्या वाड्यातच श्रीराम, सीता व लक्ष्मण, तसेच मारुती, यांची स्थापना केली. पुढे, भक्तमंडळींची संख्या आणखी वाढत गेल्यावर त्यांनी गावातच आणखी एक राममंदिर, एक दत्तमंदिर व एक धर्मशाळा' बांधून निवासाची सोय वाढवली. पुढे एक शनिमंदिरही



बांधले. शिवाय, जागोजागी उपासना वाढावी या हेतूने भक्तांना प्रेरित करून अन्य कित्येक गावी राममंदिरांची स्थापना केली. श्रीमहाराजांनी इ. स. १९०१ मध्ये मातुःश्री गीताबाई व अनेक भक्तमंडळी यांसह काशीयात्रेसाठी प्रयाण केले. त्यात त्रिस्थळी झाल्यानंतर गीताबाईंनी अयोध्येत देह ठेवला. इ. स. १८७६ व १८९६ मध्ये पडलेल्या भीषण दुष्काळात श्रीमहाराजांनी आपल्या शेतावरच नाममात्र काम देऊन हजारो लोकांना अन्न पुरविले आणि उपासमारीपासून वाचविले.

ब्रह्मस्वरूपी विलीन झालेले श्रीमहाराज हे पूर्णत्वाप्रत पोहोचलेले संत होते यात शंका नाही. देहबुद्धी मूळापासून जाळून टाकल्यामुळे त्यांच्या आचारात, विचारात आणि उच्चारात चुकून देखिल मी पणा व माझेपणा दिसायचा नाही, हेच त्यांच्या पूर्णत्वाचे गमक होय. अर्थात स्वतःबद्दल काहीच करायचे न उरल्यामुळे केवळ जगाचे कल्याण व्हावे एवढीच त्यांची भावना होती. आपण जो ब्रह्मानंद सेवन करतो तो सर्वांनी सेवावा व धन्य होऊन जावे या एकाच प्रेरणेने प्रभावित होऊन सर्व प्रकारच्या लोकांना त्यांनी जवळ केले. प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा याचा ज्ञानकोश म्हणजे त्यांचे चरित्र! प्रापंचिकाच्या प्रत्येक आध्यात्मिक शंकेचे उत्तर त्यांच्या चरित्रात सापडते. प्रापंचिक लोकांसाठी हा खटाटोप करीत असताना त्यांना अकारण निंदा, अपमान, छळ व कमीपणा सोसावा लागला. तरी देखील सर्वांनी भगवंताच्या मार्गी लागावे म्हणजे भगवंताचे नाम घ्यावे म्हणून शेवटचा श्वास असेतोपर्यंत त्यांनी प्रयत्न केला आणि केवळ जनहितार्थ आपले आयुष्य वेचून आणि सर्वस्व देवून असंख्य लोकांना भगवंताच्या नामाचा व प्रेमाचा महिमा पटवून दिला. भगवंताच्या नामाची थोरवी गाता गाता श्रीमहाराजांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण गेला. नामाचे महत्त्व सांगण्यासाठी ते जन्माला आले, नामाच्या महत्त्वाचे त्यांनी जन्मभर गायन केले. आणि आपल्या आयुष्याचे शेवटचे क्षण नामाचे महत्त्व सांगण्यातच त्यांनी घालविले. श्रीमहाराजांनी जन्मभर डोळ्यांनी नाम पाहिले, कानांनी नाम ऐकले, वाणीने नाम घेतले, मनाने नाम कल्पिले, बुद्धीने नाम चिंतिले, काया वाचा मनाने जगात एका नामाशिवाय त्यांनी दुसरे काहीच सत्य मानले नाही.

सोमवार, मार्गशीर्ष कृष्ण दशमी शके १८३५, (इ.स.२२ डिसेंबर १९१३) या दिवशी, पहाटे ५.५५ वाजता 'जेथें नाम, तेथें माझे प्राण, ही सांभाळावी खूण.' हे शेवटचे शब्द उच्चारून, या महापुरुषाने आपला देह ठेवला. जगाला प्रकाश देणारा भौतिक सूर्य पूर्वेकडे वर येऊ पहात असताना गोंदवल्याचा हा अध्यात्मसूर्य मावळला. वसिष्ठ, वामदेवादि भारतीय ऋषींची परंपरा चालविणारा हा महापुरुष अनंतामध्ये विलीन झाला.

जेथे राम नाम तेथे मी आहे. तुम्ही रामनामाला घट्ट धरून ठेवा मी तुमच्या जवळपासच आहे असे ते सांगून गेलेत. वर्षभरात अनेक उत्सव गोंदवले नगरीत साजरी होत असतात आपणही अशा ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या मठात जाऊन दर्शन घेऊ शकता. दोन दिवस निवासाची सोय त्या ठिकाणी मोफत आहे तसेच महाप्रसादाचा लाभ होतो.

# मराठी भाषा माझे शिक्षण

आधुनिक केसरी

आजही आपण बऱ्याच ठिकाणी बघतो की मराठी माणूस मराठी असून मराठी बोलण विसरला आहे. इंग्लिश भाषा बोलली जाते अरे मराठी आहात न मग मराठी बोला. जिकडे जाणं होईल तिकडे मराठी बोला. जेव्हा आपल्या मुलांना शाळेत पाठवायची वेळ येते तेव्हा इंग्लिश मेडियम, सेमी इंग्लिशमध्ये पाठवले जाते. कधी मराठी शाळेत पाठवेल मी माझ्या मुलाला असा कोणी विचार सुद्धा करत नाही. इंग्लिश मेडियममध्ये शिकून तो मुलगा हिंदी इंग्लिश वाचतो. पण त्याला कोणत्या ठिकाणी लावलेली मराठी भाषेतील पाटी वाचायला अवघड जाते. अशी वेळ त्याच्यावर येऊ नये म्हणून त्याला मराठी भाषा आत्मसात करायला सांगा. कारण आपल्या काळी का इंग्लिश मेडियम नव्हते.



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

आपण मराठी मेडियममध्ये शिकलो पण आजही ज्या राज्यात जातो. तिथली व्यक्ति त्याची मातृभाषा बोलत असली तरी आपण मराठीतच बोलतो आणि त्याला गर्वाने सांगतो. आम्ही मराठी आहोत. इंग्लिश मेडियममध्ये सुद्धा अभ्यास क्रमांत एक विषय हिंदी न ठेवता मराठी ठेवला तर आपली मराठी भाषा फक्त महाराष्ट्रतच नाही तर पूर्ण देशभर बोलली जाईल तुम्ही देशात असो किंवा परदेशात एक तरी व्यक्ति तिथ तुम्हाला मराठी माणूस भेटतो. त्या व्यक्तीला बघून आपल्याला खूप आनंद होतो. त्याच्यासोबत मराठी भाषेतून खूप गप्पा होतात, असे वाटते खूप जूनी ओळख आहे, कधी कुठे कार्यक्रमात जा किंवा लग्न समारंभाला नेहमी आपल्या मुख़ात आपली मराठी मायबोलीच असावी आणि तिचा अभिमान बाळगून मराठी बोलावे आपण बऱ्याच वेळा बघतो नोकरीसाठी मुलाखत घेत असताना समोरची व्यक्ति मराठी असून इंग्लिशमध्ये बोलणार असा विचार करून आपण घरुनच इंग्लिशची तयारी करून जातो तस न करता जर सरळ सांगून टाकले की मी मराठी आहे, आणि मराठीच बोलणार. तुम्हाला नोकरी द्यायची असेल तर द्या. केवळ इंग्लिश येत नाही मराठी बोलतो म्हणून नोकरी न देणारे खूप असतात. जर सर्वांनी ठरवल की आजपासुन कितीही अडचणी आल्या तरी मराठी बोलू, मराठी शिकउ,आपण मराठी बोलतो यात कमीपणा कधीच वाटून घ्यायचा नाही आपल्या भाषेवर गर्व असावा. काही लोक केवळ समोरचा मराठी बोलतो म्हणून त्याला कमी लेखतात. अरे तुम्ही पण मराठी मातीत जन्म घेतलाय हे विसरता कामा नये. चार पदव्या काय मिळवल्या तर आपल्या मराठी भाषेपासून लांब झालात तुम्ही ही माझ्या शिवबाची जन्मभूमी. आहे इथे प्रत्येक व्यक्ति मराठीच बोलणार जर येत नसेल तर शिकावी लागेल समजत नसेल तर विचारावी लागेल पण मराठीच बोलावी लागेल हिंदी सिनेसुष्ट्रीत सुद्धा मराठी व्यक्ति पोहचली आहे. माधुरी दीक्षित असो किंवा सोनाली कुलकर्णी या अभिनेत्री अजूनही कुठल्या समारंभाला जातात तर मराठी भाषा बोलतात. मग आपण का कमी पणा वाटून घेतो मराठी बोलण्यात आज मराठी माणूस हा कोणत्याच क्षेत्रात मागे राहिलेला नाही. आपल्या मराठी भाषेचा आपल्या सर्वांना नेहमी अभिमान असावा आणि गर्वाने सांगाव आम्ही मराठी आहोत. तुम्ही जर दुसऱ्या राज्यात राहत असाल आणि जन्म महाराष्ट्र झाला असेल तर आपल्या मुलांना लहान पणापासून मराठी भाषा बोलायला शिकवा आणि त्यांच्यासोबत मराठीच बोला. मराठी पुस्तक वाचा त्यातून मराठी माणसाने केलेला संघर्ष तुम्हाला नक्कीच कळेल.




# एसटीचे सारथ्य करताना ती लवकरच दिसणार



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**लालपरी हा महाराष्ट्रातल्या सगळ्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. लालपरीची सुरुवात झाल्यापासून लोकांच्या गरजांप्रमाणे तिच्यामध्ये अनेक बदल होत गेले. महामंडळाच्या ताफ्यात नवनवीन व त्याधुनिक बसेस दाखल होत आहेत. आरामदायी सेवा देण्याच्या दिशेने देखील महामंडळाची पाऊले पुढे पडत आहेत.**

पूर्वी बसमध्ये चालक आणि वाहक दोघेही पुरुषच असत. परंतु, मध्यंतरीच्या काळात महिलांना वाहक म्हणून काम करण्याची संधी देण्यात आली. आता बसेसमध्ये महिला वाहक प्रवाशांचे तिकीट काढताना दिसून येतात. महिला रिक्षा चालवतात, कार चालवतात, काही महिला मिनी स्कूलबसही चालवतात, पण मोठी अवजड बस चालवताना महिला सहसा दिसत नाहीत. मात्र, आता हे चित्र बदलणार आहे. एसटीच्या इतिहासात पहिल्यांदाच चालक-वाहक म्हणून महिलांची नियुक्ती होणार आहे. राज्यातील २१ विभागांत २०६ पैकी १६० चालक महिलांचे प्रशिक्षण अंतिम टप्प्यात असून लवकरच या महिला चालक एसटीचे स्टेअरिंग आपल्या हातात घेणार आहेत. यामध्ये आदिवासी भागातील काही महिलांचा देखील समावेश आहे. कोणत्याही क्षेत्रात संधी मिळाल्यास महिला आपले कर्तृत्व सिद्ध करतात.

महिलांना एसटी बस चालक म्हणून प्रशिक्षण देऊन महामंडळाने सामाजिक आणि राष्ट्रीयदृष्ट्या महत्वाचे पाऊल टाकले आहे. या महिला जेव्हा एसटीची बस चालवू लागतील तेव्हा त्यांचा आत्मविश्वास आणि धाडस सर्वांना प्रेरक ठरेल. देशातील अशा स्वरुपाचा हा पहिला उपक्रम आहे. एसटी महामंडळाचा हा उपक्रम देशासमोर नवा आदर्श निर्माण करेल. एसटीत सध्या सुमारे चार हजार महिला वाहक आहेत. आता चालक म्हणूनही महिला काम करणार आहेत. केवळ वाहक म्हणूनच नाही तर चालक म्हणून देखील महिलांना संधी देण्याचा विचार एसटी महामंडळात २०१८-१९ मध्ये सुरू झाला. यानुसार महिलांसाठी सुद्धा काही राखीव जागा ठेवण्यात आल्या होत्या. चालक पदासाठी जास्तीत जास्त महिलांचा प्रतिसाद मिळावा म्हणून यात काही अटींमध्ये बदलही करण्यात आले होते. पुरुष व महिलांसाठी अवजड वाहन परवाना व तीन वर्षे अवजड वाहन चालवण्याचा अनुभव अशी अट यापूर्वी होती. मात्र महिलांसाठी हलके वाहन चालवण्याचा परवाना व एक वर्षाचा अनुभव अशी अट ठेवण्यात आली होती.

महिला चालक भरती प्रक्रियेत ६०० अर्ज आले होते. कागदपत्रांची छाननी करून त्यातून सर्वसाधारण भागांतील १९४ तर आदिवासी भागातील २१ महिलांची निवड झाली. प्रशिक्षणानंतर शिकाऊ अनुज्ञप्ती (लायसन्स) प्रशिक्षण आणि अंतिम चाचणीनंतर या महिला चालक २०२१ मध्ये सेवेत रुजू होणे अपेक्षित होते. परंतु कोरोनामुळे त्यांचे प्रशिक्षण रखडले. कोरोनाचे संक्रमण कमी झाल्यांनतर या उमेदवारांचे एक वर्ष अवजड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण पुन्हा सुरू झाले. औरंगाबाद, जालना, परभणी, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, वर्धा या २१ विभागांत १६० महिला चालकांचे अवजड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण सुरू आहे. महिला चालकांना रोज दहा किलोमीटर बस चालविणाचे प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये घाट, रात्रीच्या वेळेस येणारे अडथळे, गर्दीच्या ठिकाणी, राष्ट्रीय महामार्गावर या ठिकाणी प्रशिक्षण सुरू आहे. अंगावर वर्दी, हातात स्टेअरिंग आणि चेहऱ्यावर अभिमानाची भावना घेऊन बस चालवणाऱ्या या महिलांची सध्या चर्चा आहे. पुण्यातील भोसरी येथे एसटीचे टेस्टिंग ट्रॅक आहे. तेथे अंतिम चाचणी होऊन त्यांची अंतिम निवड होणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या महिलांना डेपो दिला जाईल आणि त्यादेखील रोज आपल्याला बस चालवताना दिसतील. सुरुवातीला त्यांना कमी अंतराच्या मार्गावरच काम दिले जाणार आहे. महिला या कुठल्याच क्षेत्रात मागे नाहीत. पुरुषांच्या बरोबरीने त्या सगळीकडे उभ्या राहतात. मात्र, काही क्षेत्र अजूनही आहेत जिथे पुरूषांचे वर्चस्व कायम आहे त्यापैकी एक क्षेत्र म्हणजे एसटी. आता त्या एसटीतही आपले वर्चस्व सिद्ध करित आहेत. एसटी मध्ये दाखल झालेल्या महिलांनी चालक पदापासून सर्वच पदांचा पदभार स्विकारलेला आहे. २००३ नंतर वाहक पदावर





त्यांना संधी मिळाली होती. चालक पदावरही त्यांना संधी मिळावी अशी ईच्छा अनेक महिलांनी व्यक्त केली होती. महिलांच्या या मागणीचा विचार करून त्यांना ही संधी देण्यात आली आहे. एक महिला पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करू शकते हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या या निर्णयातून पुन्हा एकदा सिद्ध होतं. आता एसटीही चालवताना आपल्याला महिला दिसणार असल्याने या नव्या बदलाचे स्वागत करायला हवे, अशी अनेक महिलांची भावना आहे.

# जागरूकतेचा अभाव आणि कर्करोगाचा प्रसार



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**कॅन्सर, टीबी आणि हार्ट अटॅक यासारख्या आजारांची आकडेवारी कोरोनाच्या काळात समोर येऊ शकली नव्हती. मात्र आता आलेली कर्करोगाची ताजी आकडेवारी देशाची भयावह स्थिती दर्शवते. पंजाब, हरियाणा, हिमाचल आणि चंदीगडमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. काही दिवसांपूर्वी राज्यसभेत अधिकृत आकडेवारी सादर करताना, केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी स्वत: सांगितले की 2020 ते 2022 या काळात देशात कर्करोगाच्या रुग्णांमध्ये आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत वाढ झाली आहे.**


इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आइसीएमआर) च्या राष्ट्रीय कर्करोग नोंदणी कार्यक्रमानुसार, 2020 मध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची अंदाजे संख्या 13,92,179 होती आणि 2021 मध्ये ती 14,26,447 आणि 2022 मध्ये 14 ,61,427 वाढली. 2020 मध्ये भारतातील कर्करोगाने मृत्यूचे अंदाजे प्रमाण 7,70,230 होते आणि ते 2021 मध्ये 7,89,202 आणि 2022 मध्ये 8,08,558 पर्यंत वाढले आहे.

एका प्रश्नाच्या उत्तरात आरोग्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग, राज्यांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या आधारे, आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) कर्करोग, मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, स्ट्रोक प्रतिबंध आणि नियंत्रण (एनपीसीडीसीएस) या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत , राज्ये आणि केंद्र केंद्रशासित प्रदेशांना तांत्रिक आणि आर्थिक मदत पुरवली जाते. कर्करोग हा एनपीसीडीसीएस चा अविभाज्य भाग आहे आणि या कार्यक्रमाचा उद्देश पायाभूत सुविधा मजबूत करणे, मानव संसाधन विकास, आरोग्य संवर्धन आणि कर्करोग प्रतिबंध, त्याचे लवकर निदान, व्यवस्थापन आणि कर्करोगासह असंसर्गजन्य रोग (एनसीडी) चे उत्तम आरोग्यसेवा उपचार यासाठी जागरूकता निर्माण करणे यावर लक्ष केंद्रित केले आहे.

एनपीसीडीसीएस अंतर्गत, 707 जिल्हा एनसीडी केंद्रे, 268 जिल्हा काळजी केंद्रे आणि 5,541 सामुदायिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आणि सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवेचा एक भाग म्हणून सामान्य असंसर्गजन्य रोग, म्हणजे मधुमेह, उच्च रक्तदाब आणि सामान्य कर्करोग यांच्या प्रतिबंध, नियंत्रण आणि तपासणीसाठी लोकसंख्या-आधारित उपक्रम देखील सुरू करण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत, तीस वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना तोंड, स्तन आणि गर्भाशयाच्या मुखाच्या तीन सामान्य कर्करोगाच्या तपासणीसाठी लक्ष्य केले जाते. 2022 मध्ये कर्करोगाच्या रुग्णांची अंदाजे संख्या 1461427 होती, ज्यामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त होत्या. महिलांची संख्या 749251 तर पुरुषांची संख्या 712176 होती. महिला आणि पुरुषांमध्ये सर्वाधिक कर्करोग पचनसंस्थेच्या अवयवांमध्ये (2,88,054), स्तन (2,21,757), प्रजनन प्रणाली (2,18,319), तोंड (1,98,438) आणि श्वसन प्रणाली (1,43,062) मध्ये होतात.

महिला आणि पुरुषांमध्ये वयाच्या 74 व्या वर्षांपर्यंत कर्करोग होण्याचा धोका नऊपैकी एक असा आहे. पुरुषांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाचा धोका 67 पैकी एक आणि महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका 29 पैकी एक असे प्रमाण आहे. इंडियन मेडिकल कौन्सिल ऑफ रिसर्चच्या डिसेंबर 2022 च्या आकडेवारीनुसार, देशात स्तनाच्या कर्करोगाची सुमारे 1,82,000 प्रकरणे आढळून आली आहेत. 2030 पर्यंत ही प्रकरणे अडीच लाखांपर्यंत वाढू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, 2018 मध्ये कर्करोगामुळे एकूण 96 लाख मृत्यू झाले. यापैकी सत्तर टक्के मृत्यू गरीब देशांमध्ये किंवा भारतासारख्या मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये झाले आहेत. याच अहवालानुसार, भारतात कर्करोगामुळे 7.84 लाख मृत्यू झाले आहेत. म्हणजेच कर्करोगामुळे होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी आठ टक्के मृत्यू हे एकट्या भारतात झाले आहेत.

पंजाब, हरियाणा, हिमाचल आणि चंदीगडमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. पंजाबमध्ये 2018 मध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या 36801, 2019 मध्ये 37744 आणि 2020 मध्ये 38636 झाली. हरियाणात 2018 मध्ये 27665,



2019 मध्ये 28453 आणि 2020 मध्ये 29219 कॅन्सरची प्रकरणे आढळून आली. हिमाचलमध्ये 2018, मध्ये 8012, 2019 मध्ये 8589 आणि 2020 मध्ये 8777 प्रकरणे आढळून आली. चंदीगडमध्ये 2018 मध्ये 966, 2019 मध्ये 994, 2020 मध्ये 1024 प्रकरणे आढळून आली. सध्या पंजाबमध्ये एक लाख लोकांमागे ९० रुग्ण कर्करोगाने ग्रस्त आहेत. गेल्या सात वर्षांत दरवर्षी सरासरी 7586 नवीन प्रकरणे समोर आली आहेत. सरकार कर्करोगग्रस्तांच्या उपचारावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याचा दावा करत असले तरी जनजागृतीअभावी त्याची कहाणी उलटी आहे.

आजदेखील अनेक स्त्रिया लाज आणि भीतीमुळे आजार सांगायला तयार नाहीत. कर्करोगावर उपचार घेत असलेले अनेक रुग्ण कर्करोग हा पिढ्यानपिढ्याचा आजार आहे, असे मानतात, तर वैद्यकीय शास्त्रानुसार केवळ पाच टक्के कर्करोग पालकांकडून मुलांकडे जातो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पंजाबमध्ये कॅन्सरचे प्रमाण वाढण्यामागे कीटकनाशकांचा अतिवापर हे एक कारण असल्याचे सांगण्यात आले आहे. नैऋत्य पंजाबमधील कापूस पिकवणाऱ्या जिल्ह्यांमध्ये कॅन्सरचे प्रमाण असामान्यपणे जास्त आहे, जे इतर घटकांसह कीटकनाशकांच्या वापराशी संबंधित आहे. जगभरातील देशांमध्ये कर्करोगाविरुद्धचे युद्ध सुरू आहे. पण जितक्या वेगाने उपाय शोधले जात आहेत तितक्याच वेगाने त्याचा प्रसारदेखील होत आहे. मात्र, या आजारापासून मुक्ती मिळवण्यासाठी देशी पद्धतींद्वारे उपचाराच्या शक्यता शोधण्याचे अनेक प्रयत्न सुरू आहेत. आहारात बदल करून त्यांच्यावर उपचार करण्याचेही काही प्रयत्न चालले आहेत.

असाच एक प्रयोग जादवपूर विद्यापीठाच्या वैद्यकीय विभागात करण्यात आला, ज्यामध्ये दैनंदिन आहारात वापरल्या जाणाऱ्या पदार्थांपासून बनवलेल्या सर्वपिष्टी या औषधाची चाचणी करण्यात आली. औषधाच्या परिणामकारकतेची पातळी तपासण्यासाठी साधारणपणे दोन प्रकारच्या चाचण्या केल्या जातात- पहिली म्हणजे औषधीय (फार्माकोलॉजिकल) चाचणी आणि दुसरी विष विद्यासंबंधी (टोक्सीकोलाजिकल) चाचणी. आयात केलेल्या पांढऱ्या उंदरांवर या चाचण्या करण्यात आल्या. प्राण्यांच्या शरीरात कर्करोगाच्या पेशी प्रविष्ठ करण्यात आल्या आणि जेव्हा ट्यूमर तयार झाला तेव्हा औषध द्यायला सुरुवात केली गेली. 'पोषण ऊर्जा' चाचणी स्थितीत, चौदा दिवसांनंतर आढळलेला प्रतिसाद पाहिला असता, या पेशींची संख्या लक्षणीयरीत्या कमी होऊ लागली होती. प्राण्यांच्या शरीरात अल्सर निर्माण झाले नाहीत.

ट्यूमरच्या वाढीचा दर सहाचाळीस टक्क्यांनी कमी झाला आणि औषधाची विषारीता जवळजवळ शून्य होती. असे सकारात्मक परिणाम अलीकडच्या काळात दिसून आले नव्हते. या औषधामध्ये कॅन्सरपासून बचाव करण्यासाठी आणि त्याच्याशी लढण्यासाठी अपार अशी शक्यता आहेत. चाचण्या घेणाऱ्या डॉ. चॅटर्जी यांच्या निष्कर्षांवरून हे औषध कर्करोगाच्या रुग्णांसाठी अत्यंत प्रभावी असल्याचे सिद्ध झाले आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राबरोबरच कर्करोगाच्या रुग्णांच्या उपचारातही त्याचा उपयोग प्रभावी ठरला आहे. परंतु औषधांना मान्यता देणाऱ्या संस्थांनी अजून त्याला मान्यता न दिल्याने ते अद्याप बाजारात उपलब्ध झाले नाही. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की तुमच्या कर्करोगाच्या उपचारात काही दिवसांचा विलंबदेखील घातक ठरू शकतो. दुसरी सकारात्मक गोष्ट म्हणजे थायरॉईड, गर्भाशय आणि स्तनाचा कर्करोग यांसारख्या काही प्रकारच्या कर्करोगाच्या जवळपास इलाज शंभर टक्के पोहचला आहे. टेस्टिक्युलर आणि थायरॉईड सारख्या कर्करोगात, आपण सहजपणे म्हणू शकतो की बरे होण्याची शंभर टक्के शक्यता आहे, परंतु स्वादुपिंड (पेनक्रिएटिक) सारख्या कर्करोगाच्या इतर प्रकारांच्या बाबतीत, जगण्याची शक्यता कमी आहे. खरं तर कोणते संशोधन आपल्याला बरा होण्याच्या जवळ जाईल हे सांगता येणे कठीण आहे. आम्ही खात्रीने एवढेच म्हणू शकतो की औषधे, केमो आणि रेडिएशनद्वारे उपचार चांगले होत आहेत.

# संस्कारक्षम -चरित्र - किशोर कादंबरी : जगावेगळा कीर्तनकार



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी

**मराठी बालसाहित्यातील आजचे आघाडीचे लेखक अशी ओळख असलेले बबन शिंदे एखादा विशेष लेखन-विषय निवडून , अभ्यासपूर्ण पद्धतीने आपले लेखन पार पाडत असतात . हे मी खात्रीपूर्वक सांगण्याचे ठोस कारण ही तसेच आहे ते म्हणजे- आम्ही दोघेही मराठवाड्यातील, ते कळमनुरीचे आणि मी आता पुणेकर असलो तरी आहे परभणीचा. त्यामुळे - अगदी आरंभापासून म्हणजे बबन शिंदे नवोदित असण्याच्या काळापासून आम्ही छान मित्र आहोत. शिक्षक असलेले बबन शिंदे हे ग्रामीण परिसरातील मुलांसाठी ते गुरुजी आणि सर " अशा दोन्ही भूमिका प्रभावीपणाने पार पाडीत आहेत. त्यांनी बालसाहित्याचे क्षेत्र मनातून आणि मनापासून निवडले आहे, त्यांचे आशयसंपन बाल-साहित्य गेली अनेक वर्षापासून बालमनावर संस्कार-कार्य करीत आहे याचे कौतुक माझ्या सारखे मित्र तर करतीच असतात. त्यांना राज्य शासन पुरस्कार, राज्यस्तरीय पुरस्कार मिळतात "ते त्यांच्या संस्कारक्षम बाल-साहित्याच्या लेखनामुळेच.**

२०२१ पर्यंत त्यांच्या प्रकाशित पुस्तकांची संख्या -२१ आहे. यात बालसाहित्य पुस्तके जास्त आहेत आणि काही थोडी पुस्तके कविता -संग्रहाच्या रुपात त्यांनी मोठ्यांसाठी लिहिली आहेत. हा त्यांचा ओझरता परिचय आहे असे समजावे असो.

आपल्या सामजिक जीवनात प्रबोधन करणाऱ्या थोर व्यक्तिमत्वांची मोठी परंपरा आहे. पिढी दर पिढी त्यांच्या कार्याची माहिती करून देणारी लेखक - मंडळी आहेत अशा जाणत्या मंडळीत लेखक -बबन शिंदे यांचा समावेश यापुढे नक्कीच केला जाईल. त्यांच्या बाल-साहित्याच्या काही पुस्तकांची शीर्षके पहा - १. संत चरित्र (बालकांसाठी ), २.गोष्ट आधुनिक संताची (दीर्घ कथा ), **माणिक झाला राष्ट्रसंत (किशोर कादंबरी )..** याच मालिकेत महत्वाची ठरेल अशी त्यांची किशोर कादंबरी "अनोखा कीर्तनकार " ,हे लेखन म्हणजे " संत गाडगेबाबा "यांचे चरित्र असून गाडगेबाबांनी केलेल्या समाज-कार्य बद्दल खूप छान असे लेखन बबन शिंदे सरांनी केले आहे. बाल-मनावर गाडगेबाबांचे व्यक्तिमत्व त्यांनी खोलवर ठसवले आहे "असे म्हणावेसे वाटते.

०५ डिसेंबर -२०२१ रोजी बबन शिंदे लिखित "जगावेगळा कीर्तनकार " ही किशोर कादंबरी- पंढरपूर येथील समीक्षा प्रकाशनाने प्रकाशित केली आहे.

८८ - पानांच्या या किशीर कादंबरीत एकूण चौदा प्रकरणे असून ..अतिशय ओघवत्या लेखन शैलीतून गाडगेबाबांच्या जीवनाचा आलेख लेखक बबन शिंदे यांनी मांडला आहे. समाज-सुधारक गाडगेबाबा "यातून अगदी स्पष्टपणे -वाचकांच्या मनात उमटतात अगदी लहानपणीचे डेबुजी, तरुणपणीचे डेबुजी , जनतेने ज्यांना थोर संत. गाडगेबाबा मानले, त्यांच्याबद्दल सांगतांना लेखक बबन शिंदे त्यांचा किशोरवयीन वाचक आहे " याचा ते स्वतःला विसर पडू देत नाहीत, त्यामुळे जगावेगळा कीर्तनकार "ही किशोर कादंबरी अतिशय सुबोध शैलीतील वाचनीय किशोर कादंबरी झाली आहे.

याबद्दल लेखक बबन शिंदे यांचे कौतुक करायला हवे आहे. जगावेगळा कीर्तनकार "या किशोर-कादंबरी ची अतिशय समर्पक अशी प्रस्तावना श्री.मनोज तायडे यांनी लिहिली आहे.

ही किशोर कादंबरी आहे " म्हणून फक्त मुलांनीच वाचावी असे मुळीच नाही. उलट नव्या पिढीतील सर्व वयोगटातील वाचकांनी जगावेगळा कीर्तनकार " जरूर वाचावी जेणेकरून "गाडगेबाबा या थोर व्यक्तिमत्वाची नव्याने ओळख होईल.




२३ फेब्रुवारी १८७६ ते २० डिसेंबर १९५६ हा गाडगेबाबा यांचा कालखंड आहे ज्या काळात ,ज्या परिस्थितीत गाडगेबाबांनी जनजागृती केली , परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न चालूच ठेवला ", ती परिस्थिती फारशी बदललेली नाही . म्हणून अशावेळी गाडगेबाबांचे कार्य या पिढीला प्रेरक ठरणारे आहे". आणि हाच महत्वाचा संदेश देण्याचे कार्य लेखक -बबन शिंदे यांनी त्यांच्या "जगावेगळा कीर्तनकार " या किशोर कादंबरीतून केले आहे. चित्रकार -संतोष धोंगडे यांनी गाडगेबाबांचे रेखाचित्र , आणि फोटो ' असे केलेले मुखपृष्ठ खूप छान झाले आहे. लेखक-मित्र बबन शिंदे यांच्या लेखन -प्रवासास एक शुभेच्छा .

**पुस्तक-परिचय लेख-**
**ले- अरुण वि.देशपांडे -पुणे.**
**संपर्क - 9850177342**
**संस्कारक्षम -चरित्र - किशोर कादंबरी "**
**जगावेगळा कीर्तनकार "**
**पृ.८८ , मूल्य- रु.१२०/-**
**ले- बबन शिंदे -कळमनुरी, जि. हिंगोली, संपर्क -9527868181 प्रकाशक - समीक्षा पब्लिकेशन- पंढरपूर**
**संपर्क - 9689141201**



# परीस्थिती सगळ्यात मोठा गुरु!

आधुनिक केसरी

आपल्या जीवनात परीस्थिती हा सगळ्यात मोठा गुरू आहे.कारण कठीण काळात येणारी परीस्थिती आपल्याला कसे जगायचे ,कोणाशी कसे वागायचे हे परीस्थितीशीवाय दुसरे कोणी शिकवु शकत नाही. बर्याच जणांच्या मनात न्युनगंड असतो की मी गरीब कुटुंबात जन्माला आलो.खरं सांगायचे म्हणजे गरीबी ही शाप नसून ती माणसाला घडवत असते.आपण गरीब म्हणून जन्माला आलो तरी श्रीमंत होणे हा आपला अधिकार आहे. जीवनात कितीतरी लोक आहेत ज्यांनी परीस्थितीचा सामना करत जीवनात यशस्वी झाले आहेत.



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

ज्यांनी परीस्थिती वर मात केली अशीच माणसं जीवनात यशस्वी झाली. परीस्थितीवर मात करून जीवनात मेहनत ,जिद्द, चिकाटीच्या जोरावर यश मिळवा. परीस्थितीशी जुळवून घेता आलं पाहिजे. स्वताःमध्ये बदल घडवून आणण्याची ताकद आपल्यात असली पाहिजे.

जीवनात परीस्थिती कधीच एकसारखी राहत नसते.धीराने आलेल्या परीस्थीतीचा सामना करावा.कोणत्याही परीस्थीतीत न डगमगता आपलं स्वप्न साकार करा. परीस्थिती सुधारत नाही. म्हणून हात पाय गाळून बसू नका ,पळवाटा शोधू नका.बदल घडवून आणा अंगात कर्तृत्व ,झेप घेण्याची ऊर्मी असली तर आयुष्यात काहीही कमी पडणार नाही. प्रत्येकात अंगभूत कौशल्य असतात.आपलं कौशल्य ओळखा .कोणावरही अवलंबून राहू नका.स्वताःच स्वताःला घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.आपण परीस्थीती सुधारण्याची वाट पहात असतो.परंतू परीस्थिती बदलणं आपल्या हातात आहे.

कष्टाशिवाय कोणतेही फळ मिळत नाही.हे ध्यानात ठेवा.मी काहीतरी करून दाखविनच हा आशावाद मनात असला पाहिजे.प्रत्येकामध्ये काही ना काही करण्याची प्रचंड इच्छाशक्ती असते.फक्त गरज आहे ती ओळखण्याची आपण नेहमी सर्वांपेक्षा वेगळे काहीतरी केले पाहिजे.आपल्या जीवनात परीस्थिती कधीच अडसर ठरत नाही. परीस्थितीसारखा दुसरा आयुष्यात कोणताही गुरु नाही. कारण परिस्थिती आपल्या कसं जगायचे ते शिकवत असते.

# तुमचा दृष्टिकोन तुमची परिस्थिती घडवितो : प्रा. नितीन बानुगडे

## आयआयबी करियर इन्स्टिट्युट कोल्हापूर शाखेत हजारों विद्यार्थ्यांना, पालकांना प्रेरणादायी मार्गदर्शन




आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** तुमच्यात अफाट सामर्थ्य आहे, शक्ती आहे; ती तुमच्या विचारांवर अवलंबून आहे. प्रत्येक गोष्टीत चांगल शोधत जाणे याला सकारात्मक दृष्टिकोन म्हणतात परिस्थिती तुम्हाला घडवत नाही तर तुमचा दृष्टिकोन तुमची परिस्थिती घडवीत असते असे प्रतिपादन प्रेरणादायी व्याख्याते प्रा. नितीन बानुगडे पाटील यांनी रविवार, दि. २९ जानेवारी रोजी कोल्हापूर येथे केले. दहावी नंतर काय पूढे काय? हा प्रश्न नेहमीच विद्यार्थी व पालकांसमोर निर्माण होतो. त्यामुळे या काळात विद्यार्थी-पालकांमध्ये निर्माण झालेला प्रश्न, करियर निवडीसंदर्भात असलेला संभ्रम दूर करण्यासाठी आयआयबी करियर इन्स्टिट्यूटच्या वतीने कोल्हापूर येथील विद्यार्थी-पालकांसाठी सुप्रसिद्ध इतिहास अभ्यासक, लेखक व प्रेरणादायी वक्ते प्रा. नितीन बानुगडे पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कोल्हापूर शहरातील प्रायव्हेट एज्युकेशन सोसायटी ग्राऊंड २५६०, बी-खसवा संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहासमोर झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी आयआयबी करियर इन्स्टिट्यूटचे व्यवस्थापकीय संचालक दशरथ पाटील, आयआयबी लातूर चे डायरेक्टर प्रा. चिराग सेनमा, आयआयबी नांदेड शाखेचे अकॅडमीक डायरेक्टर डॉ. महेश पाटील, सल्लागार बालाजी कदम, को-ऑर्डिनेटर शेख सर, आयआयबी पुणे शाखेचे डायरेक्टर ॲड. महेश लोहारे, एस. एम. सेनमा, आणि ज्योत्स्नाबेन सेनमा, रवी सौदागर, बनवारीलाल जांगीड, सोनाली सौदागर, निलकंठ मिरकले, धनश्री मॅम, अक्षय नलदकर, महेशकुमार माने, अमित सर, सनी सर देवाशीस सर, अमोल सर, संजीव सर, मधुकर सर, राहुल सर, शिवराज सर, मुल्लानी सर, सुरज सर, राहुल कानीकर सर, कृष्णा गुडगिल्ला आदींसह संपूर्ण आयआयबी टीम उपस्थित होती. दरम्यान, विद्येची देवता असणाऱ्या सरस्वती पूजन करून व्याख्यानाची सुरुवात झाली.



आपल्या मार्गदर्शनात उपस्थित विद्यार्थ्यांना उद्देशुन पुढे बोलताना प्रा. नितीन बानुगडे पाटील म्हणाले की, तुमचं "मन" हे तुम्हाला घडविणारे शक्तिशाली केंद्र आहे, यासाठी सकारात्मकता असणे आवश्यक आहे. केवळ मी सकारात्मक आहे, सकारात्मक विचार करतो त्याचबरोबर कृतीही असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आधी नियोजन करा, कारण तुम्ही काम किती करता?, अभ्यास किती करता? हे महत्त्वाचे नाही तर तर तुम्ही तुमच्या कामाचे, अभ्यासाचे नियोजन कसे करता? याच्यावर तुमचे यश अवलंबून आहे असे यावेळी व्याख्याते प्रा. नितीन बानुगडे पाटील म्हणाले. यावेळी कोल्हापूर व परिसरातील हजारो विद्यार्थी, व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक लातूरचे डायरेक्टर प्रा. चिराग सेनमा, अकॅडमीक डायरेक्टर प्रा. डॉ. महेश पाटील यांनी तर सादिक शेख यांनी आभार व्यक्त केले.

भविष्यात आपल्या यशस्वी जडणघडणीसाठी कोणत्या क्षेत्रांत करियर घडवावे हा प्रश्न प्रत्येक विद्यार्थी–पालकांसमोर निर्माण होत असतो . दरम्यान, देशात सर्वाधिक डॉक्टर घडविणाऱ्या आयआयबी इन्स्टिट्यूटने सुरुवातीपासून आतापर्यंत विद्यार्थी, व पालक यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत आणि राबवित आहे . रविवारी, आयआयबी कोल्हापूर शाखेच्या वतीने आयोजित प्रेरणादायी व्याख्यातेप्रा . नितीन बानुगडे पाटील यांच्या केलेल्या मार्गदर्शनानंतर उपस्थित असलेल्या हजारो विद्यार्थी, पालक आणि आप्तजनांच्या चेहऱ्यावर आनंद, आत्मविश्वास आणि उत्साह दिसून आला .



## कासेगाव येथील डॉ. आनंद गवळी यांच्या आनंद हॉस्पिटलमध्ये शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** सहकार शिरोमणी वसंतदादा काळे यांच्या ७९ व्या जयंतीनिमित्त मोफत सर्व रोगनिदान व औषधपचार शिबिराचे आयोजन तालुक्यात दि.२९/१/२०२३ते ५/१/२०२३या कालवधीत विभागवार पटवर्धनकुरोली, तुंगत, कासेगांव, तसेच भाळवणी कारखाना साईटवर केलेले आहे. त्या अनुषंगाने दि.२/2/२०२३ रोजी कासेगाव येथे सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणरावजी काळे यांच्या उपस्थितीत शिबीराचे उदघाटन करण्यात आले. पहिल्याच दिवशी ३४० लोकांची तपासणी करुन औषधोपचार करण्यात आले.

यावेळी बोलताना काळे म्हणाले की, वसंतदादा काळे यांच्या जयंती व पुण्यतिथी तालुक्यात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमाने राबवित असतो. परंतू गेली दोन वर्षे कोरोनाच्या महामारीनंतर प्रथमच तालुक्यात पटवर्धनकुरोली, तुंगत, कासेगांव, भाळवणी कारखाना साईट या ठिकाणी मोफत सर्वरोग निदान व औषधोपचार शिबीराचे आयोजन करण्यात आलेले असून या शिबीराचा सर्वांनी घ्यावा असे आवाहन उदघाटन प्रसंगी काळे यांनी केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष विजयसिंह देशमुख पंचायत समितीचे उपसभापती प्रशांत देशमुख, जयसिंह देशमुख श्री विठ्ठल साखर कारखान्याचे माजी संचालक उत्तम काका नाईकनवरे, मोहनदादा उपासे, नंदकुमार दादा पाटील, सहकार शिरोमणीचे संचालक,यशवंतराव चव्हाण पतसंस्थेचे माजी संचालक उपासे, नेत्ररोग तज्ञ डॉ.मनोज भायगुडे, हनुमंत मोरे, नारायण शिंदे पांडुरंग नाईकनवरे, सुग्रीव कोळी, मंगेश उपासे, निलेश काळे, वसंतदादा काळे मेडिकल फाऊडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुधिर शिनगारे, डॉ.संदेश पडवळ, डॉ. अजित जाधव, डॉ. सुजीत जाधव, डॉ. महेश कोडलकर डॉ.जयश्री शिनगारे, डॉ.अमृता म्हेत्रे, डॉ. विजय मूढे, डॉ. आनंद गवळी आण्णासाहेब डुबल, सद्दाम मणेरी, इंगोले, उपस्थित होते.

## राज्यस्तरीय केवट समाज मेळावा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे केवट समाजाच्या ज्या काही मागण्या असतील त्या मागण्या पूर्ण करण्यासाठी केंद्रीय राज्य मंत्री भागवत कराड सर्वतोपरी मदत करणार असून समाजाच्या पाठीशी भक्कम उभा राहणार असल्याचे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते यांनी महाराष्ट्र राज्य केवट महासंघ आयोजित केवट समाजाच्या राज्यस्तरीय मेळावा दरम्यान स्पष्ट केले. यावेळी केवट समाजाची नोंद वेदांपासून रामायणापर्यंत महाभारतापासून भारताच्या स्वातंत्र्य लढ्यापर्यंत सर्वत्र आढळत असल्याचे प्रतिपादन संतोष कोल्हे यांनी केले,जगाला रामराज्य देणारे प्रभू रामचंद्र जेंव्हा वनवासात गेले तेंव्हा त्यांना देवपण प्राप्त झाले. नदी पार करून देऊन त्यांच्यात पुरुषोत्तम घडविण्याची सुरुवात केवट पासूनच झाली असल्याचे सांगून आजच्या काळात समाजातील तरुणांनी आता गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी झटले पाहिजे असे आवाहन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तर कन्नड चे आ. उदयसिंग राजपूत यांची उपस्थिती म्हणाले की,केवट समाजाला गौरवशाली इतिहास, वैभवशाली परंपरा आणि संस्कृती लाभलेली असून इतिहासाने नोंद घ्यावी असे शास्वत कार्य या समाजाने केलेले आहे. सद्य परिस्थित शासनदरबारी केवट समाजाच्या ज्या ही मागण्या असतील रखडलेले प्रश्न असतील त्या सोडविण्यासाठी मी कटीबद्ध असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.आ.राजपूत यांनी संपूर्ण भाषण केवट समाजाच्या बोलिभाषेत केले. त्यामुळे समाजातील सर्व सदस्यांना ते भावून गेले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबुलाल दूंड्यार होते यावेळी व्यासपीठावर नगरसेवक अनिल गायकवाड, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते, शहराध्यक्ष, राजेंद्र गव्हाणे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक संजय केवट यांनी केले. सूत्रसंचलन सुनील देव्हरे यांनी केले.




## नाविन्यपूर्ण पीक लागवडीतून साधली प्रगती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी विभागाच्या वतीने सोयगाव तालुक्यातील लेणापूर व सावरखेडा येथे प्रकल्प संचालक आत्मा औरंगाबाद बी.एस. तौर, प्रकल्प उपसंचालक आत्मा ए.ई.साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली रब्बी हंगाम सन २०२२-२०२३ मध्ये नाविन्यपूर्ण पिक म्हणून करडईचे प्रात्यक्षिके आत्मा अंतर्गत सावरखेडा व लेणापूर शिवारात आयोजित करण्यात आलेले होते. यात नवीन पिकाची लागवड करून क्षेत्र वाढविणे, कमी खर्चात जास्त उत्पादन घेणे तसेच उत्पादकता वाढविणे हे उद्देश साध्य करण्यात येत आहे. सदरील गावात नाविन्यपूर्ण पिकाची लागवड योग्य वेळी झाल्याने अपेक्षित उत्पादन प्राप्त होत आहे त्यामुळे गावाचे सरपंच, उपसरपंच, लाभार्थी यांनी आत्मा व कृषि विभागाचे आभार व्यक्त केले.

## जामठी येथे माध्यमिक विद्यालयात पौष्टिक तृणधान्यदिन साजरा : कृषी अधिकारी वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामठी येथे माध्यमिक विद्यालयात २०२३ वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून दिन साजरा करण्यात आला. पौष्टिक तृणधान्ये २०२३ अंतर्गत सोयगाव तालुका कृषी अधिकारी एस.जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक विद्यालयात पौष्टिक तृणधान्य पिकांचे आहारातील महत्व आणि फायदे पटवून विद्यार्थीना व ग्रामस्थ मार्गदर्शन करण्यात आले. सोयगाव कृषि विभागामार्फत विविध प्रकारच्या शेती विषयी माहिती देण्यात आली. दरवर्षी राज्यात पौष्टिक तृणधान्य दिन म्हणून साजरा करण्यात येतो. विविध कार्यक्रमांसोबतच तृणधान्य पिकांचे क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता वाढीसाठी कार्यक्रम हाती घेण्यात येऊन मंडळ अधिकारी फर्दापूर आ.जी. गुंडीले यांनी विद्यार्थ्यांना तृणधान्ये आहारातील सखोल अशे मार्गदर्शन केले. आपल्याकडील गावामध्ये प्रशिक्षण कार्यक्रम, आरोग्यावर आधारित चर्चासत्राचे आयोजन, तृणधान्य पिकांच्या विविध जाती, त्यांचे लागवड तंत्रज्ञान, तृणधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशोगाथा, मुलाखती, तृणधान्य पिकापासून बनवण्यात येणारे विविध उपपदार्थ यांची माहिती आर.जी. गुंडीले मंडळ अधिकारी यांनी शेतकऱ्यांना सांगितले. यावेळी सरपंचपती विलास राठोड, उपसरपंच कृष्णा जाधव, शाळेचे मुख्याध्यापक पडघड, ग्रामसेवक संदीप सावंत, शिक्षकवृंद, विद्यार्थी, सोयगाव कृषी विभागाचे अतुल पाटील कृषी पर्यवेक्षक फर्दापूर, मानसिंग भोळे कृषी सहाय्यक, अर्जुन सुरडकर कृषी सहायक,प्रगतीशील, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गाव, तालुका, जिल्हा राज्य अशा सर्वच पातळ्यांवर विविध कृती कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे .भरडधान्याचे उत्पादन क्षेत्र वाढविणे, प्रकिया व त्यांचे पोषणमूल्य लक्षात घेऊन आहारातील वापर वाढविण्यावर भर दिला जाणार आहे .ज्वारी,नागली,वरी या पिकाची उत्पादकता कमी असल्याने शेतकरी या पिकाची लागवड करीत नाही .त्यामुळे आहारातील वापर वाचल्यास मागणी वाढून सोयगाव तालुक्यातील शेतकरी आपोआप लागवडीकडे वळतील . **एस .जी .वाघ, तालुका कृषी अधिकारी कृषी विभाग, सोयगाव**

## पोलीस नाईक काकडे लाचलुचपतच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** चार चाकी वाहनाच्या धडकेत मृत पावलेल्या वडिलांच्या अपघातातील वाहन चालकाचा शोध घेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी वीस हजार रुपयाची लाच मागणाऱ्या शेवगाव पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्याच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल झालेल्या केला आहे त्या पोलीस कर्मचाऱ्यांचे नाव संतोष चंद्रकांत काकडे ( वय 36 पोलीस नाईक ) असे आहे. शेवगाव पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक संतोष चंद्रकांत काकडे यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शेवगाव पोलीस ठाण्यात मंगळवारी दि.३१ रोजी लाच मागितल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदाराच्या वडिलांचा काही दिवसां पूर्वी मोटार वाहन चालकावर गुन्हा दाखल करावा यासाठी आरोपीने फिर्यादीकडे २० हजार रुपयांची मागणी केली. या कारणास्तव तक्रारदाराने याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक साधना इंगळे यांनी कारवाई करत शेवगा पोलीस ठाण्यात पोलीस नाईक संतोष काकडे विरुद्ध लाच मागणी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

# आता ग्रामसेवकांचीही हजेरी बायोमेट्रिक पद्धतीने

## ग्राम विकासाला मिळणार चालना

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**सिल्लोड :** तालुक्यातील प्रत्येक गावात ग्रामपंचायतीशी निगडित कामासाठी, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांची दरवेळी वाट बघत ताटकळत बसण्याची वेळ आता नागरिकांना येणार नाही. तसेच त्यांना शोधण्यासाठी धावाधाव करण्याची तसेच फोनवर संपर्क साधण्याची गरज देखील तेथील नागरिकांना आगामी काळात पडणार नाही. ग्रामपंचायत कारभारात महत्त्वाचे घटक असलेल्या ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांना कार्यान्वित करण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये कार्यालयीन वेळेत उपस्थितीसाठी आता बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करण्याबाबतचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला. ग्रामीण भागातील गावाच्या विकासाचा कणा समजले जाणारे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी वेळेत उपलब्ध झाल्याने नागरिकांची गैरसोय आगामी काळात टळून गावच्या विकासाला अधिक चालना मिळणार आहे.

बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बाबतचे पत्र शासनस्तरावरून येथील गटविकास अधिकारी यांना प्राप्त झाले आहे. त्यामध्ये तत्काळ कार्यवाही करून घेण्यात यावी, अहवाल शासन स्तरावर पाठवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. मात्र, ही पद्धत सुरू करण्यासाठी लागणारी यंत्रे अद्याप उपलब्ध झालेली नाहीत. बायोमेट्रिक हजेरी नंतर गावातील नागरिकांच्या समस्या अधिक वेगाने सुटणार आहेत. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांना लागू होणारी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली ही गावच्या विकासासाठी वरदान ठरणारी असून गावाचा खऱ्या अर्थाने विकास साधायचा असेल, तर या कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी प्रणाली सुरू करण्याची गरज निर्माण झाली होती. त्यामुळे कमी लोकसंख्येच्या गावात ग्रामसेवकांचे येणे-जाणे दुर्मीळ होणार नाही. आणि काही ठिकाणी तर गावांचा कारभार सरपंच व त्या-त्या ग्रामपंचायतीच्या लिपिकामार्फत हाकला जात असल्याचे चित्र पहावयास मिळत होते. ग्रामसेवक नसल्याने ग्रामपंचायत कार्यालय केवळ दोन तास उघडे राहतात. कर्मचारी मात्र ग्रामपंचायत उघडी न ठेवता कुलूप लावून घरी जात असल्याचे चित्र पहायला मिळत होते परंतु या निर्णयामुळे या गोष्टीला बऱ्यापैकी आळा बसेल अशी सर्वसामान्यांची ईच्छा आहे.



सिल्लोड तालुक्यात एकुण 103 ग्रामपंचायती असून सर्वच ग्रामपंचायतीत आम्ही बायोमेट्रिक मशीन उपलब्ध करुन दिले आहेत आणि त्याचा प्रयोगही सुरु आहे. लवकरच सर्व ग्रामपंचायतीत ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांची बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी लागेल.

– डी.एस. आहिरे,
(गटविकास अधिकारी, पंचायत समिती सिल्लोड)



# वाणेगाव सोसायटीच्या वतीने काशिनाथ पाटील जाधव यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** वाणेगाव सोसायटीच्या वतीने शरद जोशी शेतकरी संघटना विचार मंचचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष काशिनाथ पाटील जाधव यांचा सत्कार वाणेगाव सोसायटीच्या वतीने शरद जोशी शेतकरी संघटना विचार मंचचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष काशिनाथ पाटील जाधव यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या चेअरमन सौ शोभाबाई सुखदेव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मीटिंग घेण्यात आली त्याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष रायभान धोंडकर संस्थेचे सन्माननीय संचालक सर्वश्री बाबुराव पाटील जाधव रावसाहेब सोटम बाबासाहेब अंबादास जाधव बाबासाहेब कचरू जाधव गणेश चंद्रभान जाधव रामकृष्ण भोकरे मंगेश सोटम सखा हरी अप्पा जाधव प्रवीण निकम नंदू घोडके मा चेअरमन कारभारी पाटील जाधव माजी सरपंच सुभाषराव गायकवाड आशाताई जाधव व्हाईस चेअरमन कारभारी सोनवणे गणेश भिकनराव जाधव उत्तम बाबुराव गणेश गांगोडे बाळासाहेब शेळके व इतर मान्यवर तसेच गावकरी मंडळी उपस्थित होते संस्थेच्या वतीने व्हाईस चेअरमन रायभान दौंडकर यांच्या हस्ते श्री काशिनाथ पाटील जाधव यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी श्री सुखदेव पाटील जाधव सुभाषराव गायकवाड यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. सत्कारला उत्तर देताना काशिनाथ पाटील जाधव यांनी सांगितले की शेतकऱ्यांसाठी ही चळवळ असून शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी मी बांधील आहे वेळप्रसंगी शेतकऱ्यांसाठी आंदोलन अथवा उपोषण करण्याची वेळ आली तरी ती माझी या संघटनेच्या माध्यमातून करण्याची तयारी आहे आतापर्यंत मी 40 वर्ष प्रशासकीय सेवेमध्ये घातले येथून पुढे पुढील आयुष्य शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी घालवायचे असून शेतकरी बांधवांनी या संघटनेचे सदस्य व्हावे व ज्यावेळेस शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण माझ्यासोबत राहाव अशी इच्छा व्यक्त केली. शेवटी संस्थेचे सचिव रवींद्र सपकाळ यांनी आभार मानले.

# धिंड काढण्याचा प्रकार अंधश्रद्धेतून

## जादुटोणा विरोधी कायद्याचे कलम लावण्याची अंनिसची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** चांदवड तालुक्यातील शिवरे या गावात एका विधवा महिलेचे तोंड काळे करून व चप्पलांचा हार घालून गावातून तिची धिंड काढण्यात आली. हा प्रकार अंधश्रद्धेतुन झाला असून जादुटोणा विरोधी कायद्याचे कलम लावण्याची महाराष्ट्र अंनिसचे प्रधान सचिव डॉ.ठकसेन गोराणे व राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी केली आहे.

या मागणीचे निवेदन ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांना देण्यात आले आहे. स्थानिक वडनेर भैरव येथील पोलीस आधिकाऱ्यांना देखील आवाहन करण्यात आले आहे. विधवा महिलेचे तिच्या पतीच्या निधनानंतर सासरच्या लोकांशी वाद झाले होते. त्यातुन नवऱ्याच्या दशक्रिया विधीच्या दिवशी तिची धिंड काढण्यात आली.या घटनेत गुन्हा दाखल होत नव्हता. महाराष्ट्र अंनिसने प्रभावी हस्तक्षेप केला. विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांच्यामार्फत पोलीस महासंचालक व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना गुन्हा नोंदविण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे गुन्हा दाखल झाला. मात्र या घटनेमागे अंधश्रद्धा असावी अशी शक्यता कार्यकर्त्यांनी व्यक्त केली होती ती शक्यता खरी ठरली आहे. याबाबत सदर महिलेने फिर्यादीत तसा उल्लेख केला आहे. आरोपींनी देखील हिच्या अंगात देवी आली, तिची पुजा करा, तिची मिरवणूक काढा असे म्हटले आहे त्यामुळे सदरचे कृत्य हे जादुटोणा विरोधी कायद्याचे उल्लंघन करणारे आहे, म्हणून त्या कायद्याचे कलम लावावेत अशी विनंती डॉ गोराणे व चांदगुडे यांनी केली आहे.

# सामाजिक कार्यकर्त्यांचे थेट पालिका प्रशासनाला आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दरवर्षीप्रमाणे धुळे जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते त्यासाठी बॅनर बाजीही जोरात होत असते. मग त्यात गरीब असो  किंवा श्रीमंत बॅनर हे लावणारच परंतु पालिका प्रशासन हे मतभेद करून काहींचे बॅनर काढण्यात येते असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे शंकर खरात यांचा आहे. गेल्या वर्षी कित्येक कष्ट करू शिवप्रेमींनी मोठमोठे शुभेच्छा होल्डिंग लावल्यात परंतु पालिकेत बसणारे सत्ताधारी यांनी ते फोल्डिंग काढून कारवाई केली आणि यावर्षी थेट पालिकेच्या बाहेर सत्ताधारींनी मोठमोठे होल्डिंग लावले मग त्यांच्यावर कारवाई का नाही असे प्रश्न निर्माण होत आहे त्यामुळे. सामाजिक कार्यकर्तेआनंद लोंढे व शंकर खरात यांनी थेट




पालिकेच्या आत बॅनर लावून आव्हान केले आहे. घ्या तुमच्या छाताड्यावर पालिकेच्या आत बॅनर लावले आहे छत्रपती महाराजांचं... होवून जाऊद्या आता बॅनर वॉर.. असा टोला देखील लगावला आहे   पालिका प्रशासनाचे जावई आहेत का???त्यांचे बॅनर राहू द्यायचे आणि इतरांचे काढायचे...हे खपवून घेणार नाहीत.. आयुक्त साहेब तुम्हाला बोललो होतो हे ही बॅनर काढा अथवा मध्ये आमचे बॅनर लावू ..छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे आहेत... जयंती पुरता बॅनर लावायचे हे BJP सारखे बेगडी शिवप्रेम आमचे नाही... प्रतेक दिवस छत्रपती शिवराय अमच्या विचारत.. हृदयात असतात.. अशा प्रकारे थेट पालिका प्रशासनाला आव्हान केले आहे.

# विदर्भात आढळले सर्वाधिक कुष्ठरोगी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** केंद्र व राज्य शासन कुष्ठरोग नियंत्रणासाठी प्रत्येक वर्षी कोट्यवधींचा खर्च करते. परंतु, आजही सगळ्याच जिल्ह्यांत कमी अधिक कुष्ठरुग्ण आढळत आहेत. पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यांत दर दहा हजार लोकसंख्येमागे सर्वाधिक कुष्ठरुग्णाचे प्रमाण गडचिरोलीत आहे.राज्याच्या इतर भागाच्या तुलनेत पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा या सहा जिल्ह्यांत या आजाराचे सर्वाधिक रुग्ण आढळतात. सध्या या भागात ४ हजार १४५ सक्रिय रुग्ण उपचाराखाली आहेत. सध्या गडचिरोलीत दर दहा हजारांमागे ६ कुष्ठरुग्ण, भंडारात ४, गोंदिया ३, चंद्रपूर (ग्रामीण) ५, चंद्रपूर (शहर) १, नागपूर (ग्रामीण) २, नागपूर (शहर) १ तर वर्धेत २ कुष्ठरुग्ण असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नोंदीत आहे. संसर्गक्षम कुष्ठरुग्णांशी संपर्क आल्यास या आजाराचा प्रसार होतो. गरिबी, अज्ञान, निरक्षरता, गर्दी, अस्वच्छता, निकृष्ठ राहणीमान असलेल्या भागात हा आजार जास्त आढळतो.

# गावठी कट्टा सोबत ठेवून दहशत माजवणारा ताब्यात

## धुळे स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील इसाक मज्जित जवळ  राहणारा व्यक्ती कमरेला गावठी पिस्तूल लावून फिरत असल्याची चर्चा होती. हा पराक्रम दहशत वाजवण्याच्या उद्देशाने केला असावा, असे गुप्त बातमीदाराला कळाली त्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा यांनी सापळा रचून चाळीसगाव रोड चौफुली जवळ त्याला पकडले त्याची झडती घेतल्यास त्याजवळ बिना परवाना असणारी गावठी पिस्तूल आढळून आली.

पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मोहंमद शाहीद रियाज अहमद रा. हाजीनगर, इसाक मशिदीजवळ दहशत माजविण्याच्या उद्येशाने सोबत देशी बनावटीचा गावठी कटटा सोबत घेऊन फिरत असतो व तो सध्या चाळीसगाव रोड चौफुलीजवळ व्दारका लॉजजवळ उभा आहे.

अशी बातमी मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदारांना बातमीप्रमाणे कारवाई करण्याचे आदेशीत केले. त्याअनुषंगाने पथक रवाना होवुन सदर संशयीत इसम नामे मोहंमद शाहीद रियाज अहमद रा. हाजीनगर, इसाक मशिदीजवळ धुळे यास चाळीसगाव रोड चौफुलीजवळ व्दारका लॉज जवळून ताब्यात घेऊन त्याची सोबतचे पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला



लावलेली पिस्टल ( गावठी कटटा ) मिळुन आली . सदर गावठी कटटा पाहता मॅगझीन मध्ये १ काडतुस दिसून आले ते पाहता त्यांचे वर्णन २५,००० / - रु . किं.चा एक गावठी बनावटीचे पिस्तूल ( गावठी कट्टा ) स्टील बॉडी असलेला . त्याचे ग्रीपवर दोन्ही बाजुस काळया रंगाचा स्क्रुने घट्ट बसविलेला प्लॉटीक पट्टया मॅगझीन सह ट्रीगर व गार्ड त्यासह त्यात फायरिंग पिन शाबूत असलेली पिस्टलचे मॅगझीन सह किं.अं रु. किं.चे एक जिवंत काडतूसे प्रत्येकी काडतूसाची किंमत १००० / - रु.असे किं.अं. असा एकुण २६,००० / - रु . किं . चा मुद्येमाल बाबत परवाना विचारला असता, त्याने नसल्याचे सांगितले. तरी सदर गावठी कटटा मोहंमद शाहीद रियाज अहमद हा परिसरात दहशत माजविण्याच्या उद्येशाने बेकायदेशीरित्या सोबत बाळगत असल्याची खात्री झाली. सदर मुद्देमाल जप्त करुन संबधीतांविरुध्द रविकिरण गणपत राठोड नेम स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांचे खबरीवरुन चाळीसगाव रोड पोलीस ठाणे येथे भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे . सदरची कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक  धुळे किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, पोसई योगेश राऊत , बाळासाहेब सुर्यवंशी, प्रकाश पाटील, अशोक पाटील, कुणाल पानपाटील, उमेश पवार, रविकिरण राठोड, विशाल पाटील यांनी केली आहे.

# गौतम बुद्धांच्या अस्थी दर्शनासाठी उसळला जनसागर

आधुनिक केसरी न्यूज

**राहूल त्रिभूवन**

**वैजापूर :** तथागत गौतम बुद्धांचा पवित्र अस्थिधातू कलश परभणी ते मुंबईला पायी घेऊन जाणाऱ्या थायलंडच्या भिक्खू संघाची धम्म यात्रा स्वागतासाठी शहरात मंगळवारी अभूतपूर्व जनसागर उसळला होता. बौद्ध उपासकांनी भिक्खू संघाच्या आगमन मार्गावर दीड किलोमीटर पर्यत रांगोळी आणि फुलांचा वर्षाव करत जल्लोषात स्वागत केले. १७ जानेवारी पासून थायलंड सरकार आणि सिने अभिनेते गगन मलिक फाऊंडेशन यांच्या माध्यमातून तथागत भगवान गौतम बुद्धांची अस्थिधातू कलश पायी दर्शन धम्म यात्रा काढण्यात आली आहे.



या यात्रेत थायलंड येथील ११० भिक्खू संघाचा समावेश आहे.पायी पदयात्रेचे मंगळवारी शहरात आगमन झाले होते. प्रसंगी आ.रमेश बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, माजी नगराध्यक्ष साबेरखान, डॉ.राजीव डोंगरे, मर्चंट बँकेचे चेअरमन विशाल संचेती, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत सदाफळ, हेडगेवार बँकेचे चेअरमन प्रशांत कंगले, दशरथ बनकर, दिनेश राजपूत, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार राहुल गायकवाड ,नगरपरिषद मुख्याधिकारी भागवत बिघोत, सहाय्यक पोलीस अधीक्षक महक स्वामी,पोलीस निरीक्षक सम्राटसिंह राजपूत आदीसह शहर व ग्रामीण भागातुन मोठया संख्येने बौद्ध उपासकांनी धम्म यात्रेचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. वैजापूर - गंगापूर मार्गावरुन तथागत भगवान गौतम बुद्धांचा अस्थिधातू कलश घेऊन आगमन झालेल्या थायलंडचे भिक्खू संघाचे स्वागतासाठी दीड किलोमीटर पर्यत बौद्ध उपासकांनी रस्त्यावर दुतर्फा बसून त्यांच्या चरणावर पुष्प अर्पण करुन स्वागत केले.जिल्हा परिषद मुलांची प्रशाला मैदानावर अस्थिधातू कलश दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली होती.यावेळी हजारोंच्या संख्येने उपासकांनी अस्थिधातू कलशाला अभिवादन केले.तसेच भिक्खू संघाच्या धम्मदेसना ग्रहण करण्यासाठी उपासकांची मोठया संख्येने गर्दी होती. तथागत भगवान गौतम बुद्ध-अस्थिधातू कलशाचे क्रांती जिम,डॉ. आंबेडकर पुतळा, पोस्ट ऑफिस, आंबेडकर नगर, नांदगाव या मार्गावर ठिकठिकाणी स्वागत करुन दर्शनासाठी नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तथागत भगवान गौतम बुद्ध प्रचार व प्रसार समिती ग्रामीण व शहरी नागरिक यांनी प्रयत्न केले.

# तारांचे फास लावून चितळाची शिकार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मध्य चांदा वनविभागाच्या राजुरा वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या टेंबुरवाही वन क्षेत्रातील कक्ष क्रमांक १६७ मध्ये तारांचे फासे लावून चितळाची शिकार केल्याची घटना उघडकीस आली. यावेळी चितळाच्या मांसाची विल्हेवाट लावत असताना वन कर्मचाऱ्यांनी धाड टाकून तुलाना येथील एका आरोपीस मुद्देमालसह ताब्यात घेतले. मात्र, दोन आरोपी फरार झाले.

टेंबुरवाही नियतवनक्षेत्रातील कक्ष क्रमांक १६७ मध्ये आरोपींनी तार फासे लावून चितळाची शिकार केली. नंतर त्याचे मांसाचे तुकडे करून विल्हेवाट करीत असल्याची माहिती वन कर्मचाऱ्यांना मिळाली. माहिती मिळताच घटनास्थळी धाड टाकली असता तुलाना गावातील वडगू टेकाम हा व्यक्ती मांसासह आढळून आला. त्याला ताब्यात घेण्यात आले, मात्र यात सहभागी असलेले इतर दोन आरोपी फरार झाले. ताब्यात घेतलेल्या आरोपी कडून ८ किलो चितळाचे मांस, चामडे, २१ नग तार फासे जप्त करण्यात आले.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करून आरोपी वडगू काशिनाथ टेकाम याला अटक करण्यात आली. फरार आरोपीचा शोध सुरू आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, सहायक वनसंरक्षक श्रीकांत पवार यांचे मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश येलकेवाड यांचे नेतृत्वात क्षेत्र सहायक संतोष संगमवार, प्रकाश मत्ते, वनरक्षक अर्जुन पोले, वर्षा वाघ, सायस हाके, एस.डी. सुरवसे, सुनील गजलवार, मीरा राठोड, डी.एम. चंदेल, सुनील मेश्राम यांनी केली. पुढील तपास सुरू आहे.



# सिद्धार्थ आश्रम शाळेत दामिनी पथकाने दिले आत्मसंरक्षणाचे धडे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** चौका येथील सिद्धार्थ आश्रम शाळेत दामिनी पथकाने आत्मसंरक्षणाचे धडे दिले. पोलीस अधीक्षक मनीष कालवनिया व अप्पर पोलीस अधीक्षक सुनिल लांजेवार औरंगाबाद (ग्रा.) यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथकाचे मनीषा साळवी, कपिल बनकर यांनी पो.स्टे. फुलंब्री हद्दीत सिद्धार्थ आश्रम शाळा, चौका येथे भेट देऊन विद्यार्थिनींना आत्मसंरक्षणाबाबत धडे देऊन कायदेविषयक माहिती दिली, तसेच छेडछाडी संदर्भात तक्रार असल्यास दामिनी पथकाला सोबत संपर्क साधण्यासाठी दर्शनी भागात मो.नं. सह माहितीपर फलक लावण्यात आले. यावेळी शाळेचे मु. अ. व्ही.व्ही. तुळजापूरकर, पी. एन. लोणे व इतर शिक्षकवृंद उपस्थित होते.

# पहिल्या दिव्यांग योगासन स्पोर्ट्स स्पर्धेत ९० खेळाडूंचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** जिल्हा योग संघटना, गरवारे कम्युनिटी सेंटर व क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या जिल्हास्तरीय योगासन स्पोर्टस स्पर्धेत सावित्रीबाई फुले निवासी मूकबधिर विद्यालय हरसुल, निवासी मतिमंद विद्यालय गांधेंली, स्व इंदिरा गांधी अस्थीव्यंग निवासी विद्यालय, चैतन्य कानिफनाथ निवासी मतिमंद विद्यालय मांडकी उडान संस्था छावणी या शाळेतील ९० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा भारती व औरंगाबाद ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष मा. पंकज भैया भारसाकळे यांच्या हस्ते झाले या वेळी गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक सुनील सुतावणे, जिल्हा योग संघटनेची सचिव सुरेश मिररकर, उपअध्यक्ष डॉ पंढरीनाथ रोकडे यांची उपस्थिती होती. प्रथमच दिव्यागांसाठी औरंगाबाद शहरात या योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हि स्पर्धा दि. १ व २ फेब्रुवारी २०२३ दरम्यान गरवारे कम्युनिटी सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी औरंगाबाद जिल्हा योग संघटनेच्या तांत्रिक अधिकारी छाया मिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली छाया सोमवंशी, कोमल सुरडकर, पूजा सदावर्ते, सुवर्णा लेंभे, गायत्री पाराशर, राणि विसपुते हे पंच व अधिकारी काम बघत आहे.



# प्रवाह अनाथालयास गोदावरी पुरस्कार


आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** राजमुद्रा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तुषार पाटील तसेच ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज कोल्हापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या 11 वर्षांपासून गोदावरीचे पुजन करुन गोदाकाठावर हजारों दिवे लावुन दिपोत्सव साजरा केला जातो गोदावरी प्रगट दिन.

या निमित्ताने समाज कार्य करणार्याचा दर वर्षी गोदा पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.यंदाचा गोदावरी पुरस्कार प्रवाह अनाथालय टाकळी येथील संचालक रामेश्वर गोर्ड यांना देण्यात आला. पैठण तालुक्यातील एकमेव आनाथालय असुन याचे संचालक रामेश्वर गोर्डे यांनी या आनाथालयाची सुरुवात 2018 ला केली,ईथे आता जवळपास 33 मुले,मुलीचा साभाळ गोर्डे पती पत्नी करतात या कार्याची दखल घेत राजमुद्रा प्रतिष्ठान ने रामेश्वर गोर्डे यांना गोदावरी पुरस्कार देवुन गौरविण्यात आले.

यावेळी अध्यक्ष तुषार पाटील,नाथ संस्थानचे कार्यकारी विस्वस्त बाजीराव बारे, भागवताचार्य शिवाजी महाराज शेलुकर, पोलीस निरीक्षक किशोर पवार,माजी नगरसेवक नाथशेठ पोरवाल, कांताबापू काळे, शिवसेना महिला अघाडीच्या ज्योती काकडे, अमोल जाधव, माजी नगरसेवक सोमनाथ परळकर, शहादेव लोहारे, सरपंच निवृत्ती मापारी, ईश्वर दगडे, अस्लम पठाण, दत्ता निवारे, अजय परळकर, विजय लोहिया,समिर शुक्ला, मंगेश कुलकर्णीसह भाविकांची उपस्थिती होती.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अ‍ॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# रुग्णवाहिका उलटली; तेरा गरोदर माता गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** जिल्ह्यातील धडगाव अतिदुर्गम भागातील तेलखेडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील 13 गरोदर महिला सोनोग्राफी करण्यासाठी सकाळी निघाले असता शहादा तालुक्यातील लोणखेडा अभियंत्रिक महाविद्यालय समोर भीषण अपघात झाला यात 13 गरोदर महिला जखमी झाल्या आहेत.

शहादा पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार धडगाव अतिदुर्गम भागातील तेलखेडी प्राथमिक आरोग्य केंद्रतून 102 रुग्णवाहिकेने येत असताना भरधाव वेगात चालाकाचे नियंत्रण सुटल्याने रुग्णवाहिका पलटी झाल्याने अपघात झाला.

13 गरोदर महिला पुरूष चालक असे 14 जण अपघातात जखमी झाले आहेत आमदार राजेश पाडवी यांच्या खासगी रुग्णवाहिकेतून जखमीना शहादा येथील नगर पालिकेचे शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सर्व गरोदर मातेची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली आहे त्यांच्यावर उपचार सुरू असून घटनास्थळी व रुग्णालयात नातेवाईकांनी धाव घेतली आहे. जखमी झालेल्या गरोदर मातांमध्ये सुनिता भिका पाडवी, तेलखडी, शोभा सुभाष पावरा, मिना दुरासिंग पावरा, तिमका जितेंद्र पटले, सोनाली विलास पाडवी, प्रजोल रसिकांत पावरा, रमिला प्रताप पाडवी, अंजली परम पाडवी, वर्षा जयसिंग पाडवी, टिना धनसिंग पावरा, सरिता पावरा, धुंन्दी युवराज पावरा, कांता वळवी, ड्रायव्हर रसिकांत पावरा, देखील जखमी झाला आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश पाडवी, डॉ. गोविंद शेल्टे, डॉ. जयदिप पाटील यांनी वेळेवर गरोदर मातांवर तातडीचे उपचार सुरू केले. गंभीर जखमी गरोदर माता सुनिता भिका पाडवी हिला पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय नंदुरबार येथे हलविण्यात आले आहे.



# विद्युत कॉलनीत घरफोडी लॅपटॉपसह रोख लंपास

आधुनिक केसरी न्यूज


**जालना :** विद्युत कॉलनी, जुना जालना येथील रहिवासी व स्टेट बँकेचे निवृत्त कर्मचारी किसनराव शिरसाट यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी लॅपटॉपसह तीन हजार रुपये लंपास केले आहेत. 2 फेब्रुवारी रोजी पहाटे ही घटना उघडकीस आली. शिरसाट कुटुंबीय गेले पाच दिवस पुणे येथे गेलेले होते. ते काल परतले असता चॅनल गेट व घराचे कुलूप तुटल्याचे दिसून आले. तसेच घरातील सामानही चोरट्यांनी अस्ताव्यस्त केले होते. या प्रकरणी कदीम जालना पोलिस स्टेशनला तक्रार देण्यात आली आहे. चोरट्यांच्या टोळ्या शहरातील विविध भागात चोऱ्या करताना सीसीटीव्हीत कैद होत आहेत. त्यांना प्रत्यक्ष कैद होण्याची प्रतीक्षा नागरिक करीत आहेत.



# ५ फेब्रुवारीला होणार मॅरेथॉन स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा प्रशासनाच्यावतीने 5 फेब्रुवारी, 2023 रोजी फिट धुळे, हिट धुळे या अंतर्गत धुळे मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा 3 किमी, 5 किमी, 10 किमी, 21.1 किमी अशा चार विभागात होणार आहे. ही स्पर्धा यशस्वी होण्याकरीता मॅरेथॉनच्या मार्गावरील वाहतुक दुचाकी वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी सकाळी 5.00 ते 9.00 वाजेपर्यंत सरकारी वाहने व आपत्कालीन विभागाची वाहने वगळता सर्व वाहनांसाठी तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात येत आहे. धुळे शहर वासियांनी उपलब्ध पर्यायी मार्गाचा वापर करुन सहकार्य करावे. असे आवाहन जिल्हा पोलीस अधिक्षक संजय बारकुंड यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.



या स्पर्धेत विविध सामाजिक संस्था, विद्यार्थी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, महिला व पुरुष असे मोठया संख्येने भाग घेणार आहेत. मॅरेथॉनचा मार्ग हा शहरातील जुना आग्रारोड, दत्त मंदिर चौकातुन गोंदुर गाव असा आहे. या स्पर्धेच्यावेळी मॅरेथॉन मार्गावर मोठी वाहने आल्यास स्पर्धेत अडथळा निर्माण होवून अपघात होण्याची दाट शक्यता असल्याने पुढील प्रमाणे वाहतुकीचे मार्ग हे दुचाकी वाहने वगळता इतर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी मॅरेथॉनचे दिवशी तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात येणार आहेत.

तात्पुरत्या स्वरुपात वाहतुकीसाठी बंद करण्यात येणारे मार्ग - फाशीपुल येथे पोलीस मुख्यालयाकडे येणारा रस्ता, स्टेशन रोड येथे महात्मा फुले पुतळयाकडे येणारा रस्ता, बस स्थानक टॅक्सी कॅबीन स्टॅण्ड समोरील रस्ता, मामलेदार कचेरी येथे बारापत्थर/ पाचकंदिल येणारा रस्ता, लोकमान्य हॉस्पीटल येथे चाळीसगांव रोडकडून छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाकडे येणारा रस्ता, अग्रसेन पुतळा येथे मालेगांव रोडकडून येणारा रस्ता, नगांवबारी येथे दत्त मंदिराकडे येणारी वाहतुक बंद करण्यात येत आहे. तसेच गिंदोडीया चौकाकडून पारोळारोड कराचीवाला खुंटकडे येणाऱ्या वाहतुकीचा मार्ग, धुळे शहर जुनी महानगर पालिकेकडून कराचीवाला खुंटकडे वाहतुकीचा मार्ग, आग्रारोड दत्त मंदिर चौकाकडे येणारा वाहतुकीचा मार्ग, गांधी पुतळयाकडून येणारी वाहतुक बंद करण्यात येत आहे, पंचवटी कॉर्नरकडे शहरातुन येणाऱ्या वाहतुकीचा मार्ग बंद करण्यात येत आहे, वलवाडी टि पॉईन्ट कडून स्टेडीयम कडे येणाऱ्या वाहतुकीचा मार्ग बंद करण्यात येत आहे., गोंदुर गावाचेपुढे अर्ध मॅरेथॉनचे टर्न पॉईन्ट येथुन वाहतुकीचा मार्ग बंद करण्यात येत आहे. असे संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक, धुळे यांनी कळविले आहे.

# वंचित बहुजन महिला आघाडीतर्फे शहर कार्यकारिणी मुलाखत



आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** वंचित बहुजन महिला आघाडी तर्फे आज फुलंब्री येथे महिला जिल्हा अध्यक्ष लताताई बामणे व तालुका अध्यक्ष पुष्पाताई मोरे यांनी शहर कार्यकारणी महिलांची मुलाखत घेण्यात आली यावेळी शहरातील असंख्य महिलांनी मुलाखती दिल्या व शहर कार्यकारणी काम करण्यास आम्ही स्फुर्त आहोत असे सांगितले यावेळी फुलंब्री चे तालुका अध्यक्ष राजू दादा प्रधान यांची प्रमुख उपस्थिती होती व शहराध्यक्ष भगवान गंगावणे तालुका उपाध्यक्ष काकासाहेब शिरसाठ जिल्हा उपाध्यक्ष मंगेश गुंजाळ शहर उपाध्यक्ष राहुल उबाळे आकाश सुभाष गंगावणे रामेश्वर प्रधान शहर उपाध्यक्ष सचिन पगारे अजय भाऊ पगारे युवा नेते संतोष ढोले शीलाताई गायकवाड सुमित्रा सुराशे उज्वला केदारे नंदाताई भोसले कांताबाई गाडेकर कल्याणी उबाळे पार्वताबाई सुराशे सुमित्रा पवार शारदा पगारे निकिता गंगावणे सुनीता सोनवणे सुभाष सोनवणे लक्ष्मीबाई वाहूळ गिरजा शेजवळ शोभाबाई गाडेकर सुनंदाताई राजू प्रधान सीता लवाळकर व असंख्य महिला उपस्थित होत्या.

# श्रीगुरुजी पुरस्कारानिमित्त आयोजित 43 योग शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** रा.स्व. संघ जनकल्याण समितीच्या वतीने देण्यात येणाऱ्या श्रीगुरुजी पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने संभाजीनगर शहर व ग्रामीण भागात मिळून 43 योग शिबीर घेण्यात आले यात 32 योग शिक्षकांनी आपला सहभाग नोंदवला. दिनाक 1 डिसेंबर 2022, ते 31 जानेवारी 2023 या 2 महिन्यांच्या कालावधीत या 7 दिवसीय व 3 दिवसीय शिबिरांचे आयोजन जनकल्याण समितीच्या वतीने करण्यात आले होते. या उपक्रमात जनकल्याण समिती व डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या एम. ए. योगा विद्याशाखेच्या योग शिक्षकांचा सहभाग होता.



ही योग शिबीरे, वंडर गार्डन स्कुल विशालनगर, कन्या विद्यालय गारखेडा, स्वप्ननगरी, नरेन्द्र विद्यामंदिर, दत्तमंदिर, दिशा फेज 1, साईनगर, संत सावता माळी विद्या मंदिर फुलंब्री, विठ्ठल रुक्मिणी मंदीर, संत गाडगेबाबा उद्यान, श्री समर्थ राम मंदिर समर्थनगर, श्री एकनाथ मंदिर औरंगपुरा, शिशुविकास केंद्र ऐन 8 सिडको, संस्कार प्रबोधिनी, शिवशंकर कॉलनी, ओम बालक मंदिर हडको, दिशा हॉस्पिटल, विद्यानगर हनुमान मंदिर, सुपर थर्टी इंग्लिश स्कुल, कालिका माता मंदिर एन 9 हडको, भास्कराचार्य इंग्लिश स्कुल, चाटे स्कुल, वाडकर कॉर्नर गारखेडा, बालसंस्कार योगशिबिर शिवाजी नगर, साधना वेलनेस सेंटर, मातोश्री वृद्धाश्रम, जि. प शाळा लाडसावंगी, सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालय तळेगांव, विश्वेश्वर प्रायमरी इंग्लिश स्कुल, जि प शाळा गोकुळवाडी, जि प शाळा देवगाव, जि प शाळा वाळूज, महिला साधक नक्षत्रवाडी, जि प शाळा रोशनगाव,जि प शाळा तांदुळा, शिवाजी हायस्कूल गेवराई बाजार, जि प शाळा लोहगाव, सप्तशृंगी नगर पडेगाव आदी ठिकाणी घेण्यात आले. ऍड. सुधा चिंतामणी यांनी योग शिबीर अभियानाचे नियोजन केले. यात सहभागी योगशिक्षक पुढीलप्रमाणे आहेत. ज्योती माळी, शीतल पाटील, दुर्गा भांडवली, अंजली देशपांडे, स्वाती कुलकर्णी, साधना माळी, रोहित माने, मोनाली वैद्य, गजानन काकडे, मयुरी लाहोटी, प्रियंका बडाख, अश्विनी कोरडे, डॉ. काथार, चित्रक, नीता मुळे, प्राजक्ता कुलकर्णी, ज्योती बाहेती, प्रतिभा गिरधारी, श्रद्धा पाटील, क्षमा खडके, रामकृष्ण धारसुरकर, मोनाली वैद्य, रुपाली कुलकर्णी, शिवाजी साखळे, अलका कदम, ऋतुजा कुंभकर्ण , जागृती पगार, अनिल मोरे, मंजू कुलकर्णी, स्वाती जाधवर, दिलीप नचन. या योग शिबिरात योगसाधक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in